(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ. शी. : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील इंदू मिलच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी करावयाची उपाययोजना

मु. शी. : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील इंदू मिलच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी करावयाची उपाययोजना या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण, हेमंत टकले, संजय दत्त, भाई जगताप, प्रकाश बिनसाळे, रमेश शेंडगे, श्रीमती अलका देसाई, श्री. किरण पावसकर, ॲड. जयदेव गायकवाड, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री नरेंद्र पाटील, राम पंडागळे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

उप सभापती : आता या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होईल. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे स्मारक उभारण्याच्या संदर्भातील नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा करीत असताना तांत्रिक गोष्टींच्या नावाखाली एनटीसी, राज्य सरकार किंवा आंबेडकरप्रेमी जनता यांच्या बाबतीत या सभागृहामध्ये आपण चर्चा करीत होतो. मी सांगितले होते की, या इंदू मिलच्या जागेचा पूर्ण मोबदला एनटीसीला मिळाल्यानंतर ही जागा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी देण्याचे केन्द्र शासनाने कबूल केलेले आहे.याबाबतीत राज्य शासनाने एक पाऊल पुढे टाकलेलेआहे हे नाकारता येणार नाही.एनटीसीच्या जागेची मूळ किंमत,जनरेट होणारा टीडीआर,एफएसआय या विषयासंबंधी 2 डिसेंबर रोजी राज्य सरकारने अर्बन डेव्हलपमेण्ट डिपार्टमेण्टने नोटीफिकेशन काढून त्यातील रिझर्व्हेशन पब्लिक पर्पज आणि रेसिडेन्शियल झोनसाठी केलेले आहे हे मी सांगितलेले होते या काळामध्ये या जागेसाठी काही लोकांनी आंदोलनाचा प्रयत्न केला.मगते आंदोलन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे रामदास आठवलेयांनी केले असेल,प्रकाश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार...

आंबेडकर किंवा आनंदराव आंबेडकर यांनी केलेले असेल, या सर्वांविरुध्द एनटीसीने हायकोर्टामध्ये धाव घेतलेली आहे. हे सगळे एन्क्रोचर आहेत असा दावा एनटीसीने हायकोर्टामध्ये दाखल केल्याचा दाखला मी दिला. गेल्या वेळी मी सांगितले की, राज्य शासनाची कामगिरी नक्की समाधानकारक आहे. पण "दिल्ली अभी दूर है." याचे कारण असे आहे की, एमआरटीपी ॲक्टच्या कलम 154 खाली नोटिफिकेशन काढून स्मारकाचे रिझर्व्हेशन निश्चित केलेले असले तरी तो भाग रेसिडेन्शियल झोन करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाचा आहे. जेव्हा रेशिडेन्शियल झोनमध्ये एखादी प्रापर्टी टाकली जाते त्यावेळी आपल्याला एमसीझेडएमची परवानगी घ्यावी लागते. ती परवानगी आपल्याला मिळालेली नाही. एमसीझेएमची परवानगी बंधनकारक आहे. मागील वेळी जी एमसीझेएम झाली त्यामध्ये ती जागा पब्लिक परपझ आणि इंडस्ट्रीयल पर्पजसाठी वापरण्यात येईल अशा प्रकारचा प्रस्ताव पाठविण्यात आला. पण तेथे रेसिडेन्शियल झोन झाला नाही तर 1.33 एफएसआय निर्माण होणार नाही. त्यामुळे हा बदल करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी एमसीझेडएमची परवानगी आपल्याकडे नाही. टीडीआरच्या आधारावर हा सर्व डोलारा उभा केला जात आहे. 5 लाख 44 हजार चौ.फूटाचा टीडीआर मार्केटमध्ये विकला जाईल आणि त्यानंतर ते पैसे एनटीसीला दिले जातील. या सगळया गोष्टी घडायच्या आहेत. त्या प्रॉपर्टीमधून टीडीआर निर्माण करायचा असला तरी केन्द्र सरकारच्या एमओयूएफ डिपार्टमेण्टचे 6 जानेवारी 2011चे नोटिफिकेशन सीआरझेडमधील कोणत्याही प्रापर्टीचा टीडीआर जनरेट करण्यापासून परावृत्त करते. याचा अर्थ आपल्याला जे काही भव्यदिव्य स्मारक उभारावयाचे आहे त्यासाठी एमओयूएफच्या नोटिफिकेशन बाबत एक्सेप्शन करुन घेण्याची आवश्यकता आहे. स्मारकासाठी आपल्याला जमीन मिळालेली आहे ही बाब निश्चितच समाधानकारक आहे. परंतु अजूनही केन्द्र सरकार आणि एनटीसी यांच्याकडून आवश्यक त्या परवानग्या मिळालेल्या नाहीत हे दारुण सत्य आपल्याला नाकारता येणार नाही. तेव्हा एमसीझेडएम असो किंवा एमओयूएफ असो या दोन्हींच्या परवानग्या जेव्हा मिळतील त्यावेळी या स्मारकाची व्हायबिलिटी निश्चित होईल. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे आता सभागृहामध्ये नाहीत. त्यांनी आपल्या भाषणामध्ये असे सांगितले की, 2007, 2009,2010,2011 आणि 2012 या काळामध्ये आम्ही प्रयत्न करुन स्मारकासाठी जागा मिळविली. या ठिकाणी श्रेयाची लढाई नसली तरी एक गंभीर गोष्ट या काळामध्ये घडली.

...नंतर श्री.

गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

महोदय,याच इंदू मिलपासून दोन मिनिटांच्या अंतरावर हिंदुस्थान स्पिनिंग व विव्हिंग मिल आहे. त्या मिलची जागा देखील एनटीसीची आहे. भाई, आपण कामगार नेते आहात. आपणाला माहिती असेल की, हिंदुस्थान स्पिनिंग व विव्हिंग मिलची जागा एनटीसीची आहे. ती जागा एका मालकाला विकली. या इंडिस्ट्रीयल झोनच्या जागेवर त्या मालकाने हॉटेल बांधण्याचा प्रस्ताव प्रस्तावित केला. एका बाजूला इंदू मिलची जागा मिळविण्यासाठी लढणारी आंबेडकरी जनता आणि दुसऱ्या बाजूला दोन मिनिटाच्या अंतरावर असलेल्या हिंदुस्थान स्पिनिंग व विव्हिंग मिलची जागा एका बिल्डरला दिली. ती जागा कायद्याने दिली होती. त्यावर 6.50 एफएसआय देण्याचे काम तत्कालीन नगरविकास विभागाने केले. एका बाजूला 1.33 एफएसआय द्यावा अशी आंबेडकरी जनता मागणी करीत असताना 1967 चा डी.सी. आर. लावून व त्यासाठी डेव्हलपमेंट कंट्रोल रुलमध्ये बदल करुन पर्यायाने याबाबतच्या कायद्यामध्ये बदल करुन 6.50 चा एफएसआय बिल्डरला देऊन त्याचा फायदा करुन दिला. ही एक बाजू हिंदुस्थान स्पिनिंग व विव्हिंग मिलच्या जागेची आहे. दुसऱ्या बाजूला मात्र अजूनही इंदू मिलच्या बाबतीत एमसीझेडएमची परवानगी नाही. एमओयूएफची परवानगी नाही. मूळ पैसे घेतल्याशिवाय आम्ही जागा देणार नाही अशा पध्दतीची भूमिका एकाच सरकारने वेगवेगळया पध्दतीने घेतलेली दिसते.

महोदय,ज्यावेळेला आपण केंद्र सरकारकडे इंदू मिलच्या जागेची मागणी करावयास गेलो. त्यावेळी लक्षात आले की, 6.50 एफएसआय दुसऱ्या मिलला दिला. तो एफएसआय हा हॉटेलचा व्यवसाय करुन पैसे कमाविण्यासाठी दिला. हे सत्य समोर आले त्यावेळी 1.9.2009 ला तत्कालीन नगरविकास विभागाने दिलेली परवानगी दिनांक 21.11.2012 रोजी रद्द करण्यात आली. त्या मालकाने मधल्या काळामध्ये एफएसआयचे संपूर्ण क्षेत्रावर कर्ज घेतले, त्यातही विकासाला मोठया प्रमाणात आर्थिक फायदा झाला आहे. मला या अनुषंगाने एवढाच मुद्दा सांगावयाचा आहे की, एका बाजूला इंदू मिलची जागा मिळत नाही. दुसऱ्या बाजूला इंदू मिलच्या जवळच असलेल्या दुसऱ्या मिलच्या जागेसाठी 6.50 एवढा एफएसआय दिला जातो ही गंभीर बाब आहे म्हणून ही बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

सभापती महोदय, मी आणखी एक-दोन गोष्टींचा या ठिकाणी उल्लेख करणार आहे. त्या ठिकाणी विद्यापीठ व्हावे अशा प्रकारची मागणी सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी केली. या राज्यात ह्यूमन राईटस् आणि ॲट्रॉसिटीचे गुन्हे मोठया प्रमाणात वाढले आहेत. त्या गुन्हयांचे प्रमाण 60 टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचले आहे. या गुन्हयांच्या बाबतीत लवकरात लवकर निर्णय व्हावेत म्हणून त्या ठिकाणी एक न्यायालय देखील सुरु करण्यात यावे. अशा प्रकारचे न्यायालय सुरु केले तर सामाजिक न्यायाच्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेकराच्या नावाने अजून एक पाऊल पुढे टाकले असे दिसून येईल. म्हणून त्या इंदू मिलच्या ठिकाणी एक न्यायालय स्थापन करण्यात यावे अशा प्रकारची माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, या सगळया लढयामध्ये दलित प्रेमी जनतेने आंदोलन केले, त्यांच्याविरुध्द शासनाने शिवाजी पार्क पोलीस स्टेशनमध्ये केसेस दाखल केलेल्या आहेत, त्या केसेस विथ्ड्रॉ केल्या तर त्या स्मारकाबरोबर या दलित प्रेमीना न्याय दिल्यासारखे होईल. या दलित प्रेमीवरील पोलीस केसेस विथ्ड्रॉ करण्यात यावा अशी मी शासनास विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या प्रस्तावावरील उत्तर 11.15 वाजता सुरु करावयाचे आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी अतिशय थोडक्यात आपापले मुद्दे मांडले तर उत्तराचे भाषण देखील आज पूर्ण होऊ शकेल. कृपया सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी आपले विचार व्यक्त करण्यास सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, त्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक इंदू मिलच्या जागेवर व्हावे अशी आमची सगळयांची मागणी होती. त्या मिलच्या बाजूला चैत्यभूमी आहे. त्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे महापरिनिर्वाण झाले. चैत्यभूमी हे आमचे शक्ती स्थळ आहे. या चैत्यभूमीवर देशातील लाखो भीम सैनिक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी येतात. दिनांक 6 डिसेंबर रोजी ना भूतो ना भविष्यती अशी अलोट गर्दी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमीवर येते. चैत्यभूमीची जागा 33x33 एवढीच आहे. चैत्यभूमीची जागा अत्यंत लहान असल्यामुळे बाजूलाच बंद पडलेली केंद्र सरकारच्या अखत्यारितील इंदू मिलच्या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ऐतिहासिक स्मारक व्हावे अशी आमची सगळयांची सातत्याची मागणी होती.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ पूर्वी श्री.गिते 10:40

श्री.राम पंडागळे.....

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलितांच्या उत्कर्षासाठी, उत्थानासाठी अर्पण केले. त्यांनी आपल्या जीवनामध्ये दलितांसाठी अनेक लढे उभे केले.

सभापती महोदय, महाड येथील चवदार तळ्याचा संग्राम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी उभा केला. त्या तळ्यातील पाण्याला स्पर्श करणे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीने मोठे काम नव्हते. परंतु हिंदुस्थानातील अशी एक जमात आहे, असा एक वर्ग आहे ज्या वर्गाला या तळ्यातील पाण्याला स्पर्श करण्यास मनाई होती. ज्या तळ्यामध्ये कुत्रा, मांजर आदी प्राणी आपली विष्ठा टाकत, त्या तळ्यातील पाण्याला मात्र हिंदुस्थानातील ही जमात स्पर्श करु शकत नव्हती. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या तळ्यातील पाण्याला स्पर्श करुन आमच्या समाजाच्या व्यथा मांडल्या आणि त्या तळ्यातील पाणी दलित समाजाला उपलब्ध करुन दिले.

सभापती महोदय, काळा राम मंदिरातील प्रवेशासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सतत 5 वर्षे लढले. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी संघर्ष उभा केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे म्हणणे हेच होते की, आम्ही तुमच्यासारखी माणसे आहोत. आम्ही देखील देवाला देव मानतो, राम हा आमचा देखील देव आहे. आम्हाला त्या देवाला वंदन करु द्या. आम्हाला त्या देवाच्या मूर्तीला स्पर्श करु द्या. यासाठी त्यांनी पाच वर्षे तेथे संधर्ष केला. अनेकांची माथी फुटली, रक्तबंबाळ झालेल्या जनतेला त्या मंदिरात प्रवेश करु दिला नाही. त्यामुळे 1935 साली येवला येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घोषणा केली की, मी हिंदू धर्मीय म्हणून जन्माला आलो असलो तरी मी हिंदू धर्मीय म्हणून मरणार नाही. हिंदू धर्मीय पंडितांनी, हिंदू धर्मावर पगडा असणाऱ्या कब्जेदारांनी आम्हाला माणसासारखे वागवावे यादृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रयत्नशील होते.

सभापती महोदय, ऐतिहासिक पुणे करार झाला. या देशाचे सर्वेसर्वा महात्मा गांधी 21 दिवस उपोषणाला बसले होते. दलितांना स्वतंत्र मतदारसंघ मिळू नये म्हणून पंडित नेहरु, डॉ.राजेंद्र प्रसाद, सरोजिनी नायडू, सरदार वल्लभभाई पटेल यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनंती केली की, तुम्ही तुमची मागणी मागे घ्यावी. अन्यथा महात्मा गांधी हा देश सोडून जातील. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण आयुष्य दलितांच्या उध्दारासाठी खर्ची घातले, त्यांनी महात्मा गांधींचा विचार केला आणि पुढे ऐतिहासिक पुणे करार झाला व महात्मा गांधींना जीवदान मिळाले.

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.....

स्वातंत्र्योत्तर काळात महात्मा गांधी, पंडित नेहरु, डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर घटना तयार करण्याची जबाबदारी सोपविली. तीन वर्षे सतत परिश्रम घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना तयार केली. त्यातून त्यांना अनेक विकार झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तीन वर्षे सतत परिश्रम करुन घटना लिहिली नसती तर कदाचित दलित समाजाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आणखी 10 वर्षे सहवास लाभला असता. या देशातील दलित समाज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेला धर्मग्रंथ समजतो. आम्ही या धर्मग्रंथाला वंदन करतो.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पार्लमेंटमध्ये हिंदू कोड बिल आणले, तेव्हा त्यावेळच्या कॉंग्रेसच्या नेत्यांनी ते बिल फेटाळले होते. त्या हिंदू कोड बिलामध्ये नेमके काय होते ? महिलांना अधिकार देण्याचे प्रश्न, महिलांना शिक्षण घेण्याचा अधिकार, या सारख्या बाबींचा उल्लेख हिंदू कोड बिलात होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हे विचार मांडले नसते तर कदाचित सन्माननीय श्रीमती इंदिरा गांधी या कधीच देशाच्या पंतप्रधान होऊ शकल्या नसत्या. आदरणीय माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील याच मातीतील आहेत. परंतु, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेमुळेच त्या देशाच्या राष्ट्रपती पदी विराजमान होऊ शकल्या व त्याचा आम्हाला अभिमान आहे.

सभापती महोदय, दुर्दैवाने मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे, यासाठी आपल्याला आंदोलन करावे लागले. हे आंदोलन सतत 14 वर्षे सुरु होते. परंतु, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याची हिंमत राज्यकर्त्यांना झाली नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पवित्र नाव मराठवाडा विद्यापीठाला दिल्याने ते विद्यापीठ मोठे झाले आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी आम्हाला सतत 14 वर्षे संघर्ष करावा लागला.

सभापती महोदय, पोचीराम कांबळे यांचे नाव मला मुद्दाम या ठिकाणी घ्यावेसे वाटते. या संघर्षात पोचिराम कांबळेंचे डोळे काढण्यात आले, गौतम वाघमारे यांना आत्मदहन करावे लागले. ज्या काळात मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन पेटले होते, त्या काळात हजारो दलित कुटुंबांची घरे उद्ध्वस्त करण्यात आली, हजारो दलितांवर अन्याय झाले. पण हे आंदोलन सुरुच राहिले. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या प्रश्नाच्या माध्यमातून काही बाहेरची मंडळी नेतेपदी पोहोचली. मी त्यांची नावे या ठिकाणी घेऊ इच्छित नाही. परंतु, मला मुद्दाम या ठिकाणी हे सांगावेसे वाटते की, मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याची हिंमत माननीय श्री.शरदचंद्र पवार यांनी दाखवली होती. सरकार गेले तरी बेहत्तर, पण दलितांच्या प्रश्नासाठी, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेबांनी निर्णय घेतले. यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार गेले आणि युतीचे सरकार आले. परंतु, त्यावेळी माननीय श्री.पवार साहेबांनी जो ऐतिहासिक निर्णय घेतला, त्याला आजच्या प्रसंगी वंदन केल्याशिवाय मला राहवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

सभापती महोदय, या प्रसंगी मला एक काव्यपंक्ती आठवते. मी ती सभागृहाला ऐकवू इच्छितो.

"भीम जैसा सूर्य अगर निकला न होता,
भीम जैसा सूर्य अगर निकला न होता,
हम दलितों के जीवन में उजाला नहीं आता.
मर-मर के सह लेते हम जुल्म का सरकार, अगर....
भीम जैसा रखवाला नहीं होता."

सभापती महोदय, इंदू मिलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी मिळावी, यासाठी अनेक प्रयत्न झाले. इंदू मिलची जागा मिळवण्यासाठी माननीय श्री.विजय कांबळे यांनी 'मूठ मूठ माती जमा करुन सागर भरावा', तशी या कामाची सुरुवात केली. या प्रश्ना संदर्भात पहिल्यांदा दादर येथे जी बैठक झाली, त्या बैठकीला मी देखील उपस्थित होतो. समुद्रात भराव टाकून तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभे करावे, अशी त्यांची कल्पना होती. ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात उभारावचे, अशी कल्पना मांडली होती, त्याप्रमाणेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचेही भव्य स्मारक समुद्रात उभे करावे, अशी आमची कल्पना होती. माननीय श्री.विजय कांबळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभे रहावे, यासाठी प्रयत्न केले. परंतु, त्यापूर्वी श्री.महेंद्र कांबळे या भीम सैनिकाने इंदू मिलची 12.5 एकर जमीन स्मारकासाठी मिळावी, यासाठी सुरुवात केली होती.

सभापती महोदय, इंदू मिलची 12.5 एकर जमीन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला मिळावी, यासाठी मी आणि सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी अनेक वेळा या सभागृहात विषय उपस्थित केला होता.

यानंतर श्री.ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

नामदार मो.नसिम खान यांनी.....

उप सभापती : मी आता पुढच्या वक्त्याचे नाव पुकारत आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी भाषणास सुरूवात करावी. मी आपणास दोन मिनिटे बोलण्याची विनंती केली होती. आपण बारा मिनिटे बोलला आहात.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, अन्य सन्माननीय सदस्यांना आपण अर्धा तास वेळ देता.....

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांना जेवढा वेळ दिला त्यापेक्षा अधिक वेळ मी आपणास दिलेला आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, हा प्रश्न आमचा आहे.

उप सभापती : हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्राचा आहे. तो सर्व जनतेचा प्रश्न आहे. हा प्रश्न कोणा एकट्याचा नाही. ही कुणाची खाजगी मालमत्ता नाही. आणखी दोन मिनिटामध्ये आपले भाषण पूर्ण कराल काय ?

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आपण मला आणखी 10-15 मिनिटे वेळ द्यावा.

उप सभापती : मला माफ करावे.

श्री.राम पंडागळे : निदान पाच मिनिटे तरी द्यावीत.

उप सभापती : ठीक आहे.

श्री.राम पंडागळे : मागच्या वर्षी 10 तारखेला राष्ट्रवादी पक्षाचा वर्षापन दिन झाला. आम्ही सर्वांनी मिळून श्री.हेमंत टकले साहेबांच्या हस्ते श्री.पवार साहेबांना सनद दिली की, इंदू मिलची साडेबारा एकर जागा स्मारकासाठी मिळावी. तेव्हाच म्हणजे नोव्हेंबर महिन्यामध्ये श्री.आनंदराज आंबेडकर यांनी इंदू मिलमध्ये घुसण्या संबंधातील सूचना दिली होती आणि 6 डिसेंबरला त्यांनी इंदू मिलचा ताबा घेतला. त्यानंतर 29 तारखेला वरळी येथून मोर्चा काढण्याचे ठरले. पण एक चमत्कार झाला. तो आपण ऐकावा. त्या मोर्च्याला नामदार श्री.आर.आर.पाटील साहेब व नामदार श्री.नितीन राऊत साहेब सामोरे गेले. त्यांनी सांगितले की, हा मोर्चा थांबवा. इंदू मिलमध्ये गेलेले जे बौद्ध आहेत,

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

बौद्ध भिक्षू आहेत त्यांना बाहेर येण्यास सांगावे. आम्ही हे सगळे मान्य केले. आम्ही या दोन्ही नामदार मंत्र्यांच्या शब्दावर विश्वास ठेवला आणि सर्वजण बाहेर आलो. मग चमत्कार झाला. 30 तारखेला निरोप आला की, तुम्हाला माननीय पंतप्रधानांनी चर्चेसाठी बोलाविले आहे. 30 तारखेला दादांचे विमान भलतीकडेच गेले म्हणून 30 तारखे ऐवजी 31 तारखेला माननीय पंतप्रधानां समवेत बैठक झाली. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील साहेब, नामदार श्री.विलासराव देशमुखजी, नामदार श्री.सुशीलकुमारजी शिंदे, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री श्री.आनंद शर्मा, त्यावेळी नव्याने झालेले विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे, माननीय मंत्री श्रीमती वर्षाताई गायकवाड, श्री.एकनाथ गायकवाड साहेब, मी व श्री.आनंदराज आंबेडकर, व सर्व दलित नेतेमंडळी माननीय पंतप्रधानांच्या भेटीला गेलो होतो. या भेटीत आमच्या शिष्टमंडळाला माननीय पंतप्रधानांनी आश्वासन दिले. मी येथे माननीय मुख्यमंत्र्यांना मुद्दाम उल्लेख करू इच्छितो. ज्या पद्धतीने माननीय मुख्यमंत्र्यांनी शिष्टाई केली, ज्या पद्धतीने माननीय मुख्यमंत्र्यांनी आमची बाब माननीय पंतप्रधानांना समजावून सांगितली त्याबाबत त्यांचे अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सुरूवातच अतिशय चांगल्या पद्धतीने केली. एक महिन्यामध्ये हा प्रश्न सोडविण्यात येईल असे आश्वासन माननीय पंतप्रधानांनी दिले. परंतु, प्रश्न सुटेना. मी व आनंदराज आंबेडकर पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली की, 17 सप्टेंबर रोजी माननीय पंतप्रधान मुंबईत येत आहेत. पुन्हा त्यांच्याशी आमची भेट घडवा. आम्ही सर्व नेते मंडळी पुन्हा माननीय पंतप्रधानांना भेटलो. मला येथे सांगायला अभिमान वाटतो की, त्या भेटीमध्ये माननीय पंतप्रधान म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे फादर आहेत. हे ऐकून आम्हाला अभिमान वाटला. माननीय पंतप्रधानांचा अभिमान वाटला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा देखील अभिमान वाटला. माननीय पंतप्रधानांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख या देशाचे फादर म्हणून केला, त्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

आज मला येथे सांगायला आनंद वाटतो की, या स्मारकाची घोषणा पार्लमेंटमध्ये झाली. तो आमच्यासाठी ऐतिहासिक क्षण आहे.

यानंतर श्री.अजित...

अशुद्धीत प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

केंद्रीय मंत्री श्री.आनंद शर्मा यांनी संसदेमध्ये परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी इंदू मिलची जागा देण्याची घोष्णा केली, त्यावेळी आम्हा सर्व दलितबांधवांना फार आनंद झाला.

सभापती महोदय, आपण घरातील मोठ्या भावाला "दादा" म्हणतो. तेव्हा "दादागिरी" म्हणजे आमचा मोठा भाऊ. तेवढ्याच दादागिरीने कोणताही विनोद न करता माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांच्या साक्षीने, या पृथ्वीचा राजा माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या शिष्टाईने मनमोहनांच्या मनासारखी, मनमोहन दलितांच्या मनासारखी इंदू मिलची साडेबारा एकर जमीन आम्हाला दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. कोणी काहीही म्हणो परंतु हा ऐतिहासिक क्षण आहे. या ऐतिहासिक क्षणाला दोन्ही सभागृहे साक्षी आहेत. मी दोन्ही सभागृहांचे अभिनंदन करतो. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे व शिवसेना पक्षाचे मी अभिनंदन करतो. इंदू मिलची साडेबारा एकर जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी देण्याबाबतचा ठराव दोन्ही सभागृहाने केला त्याबद्दल मी पुन्हा एकदा दोन्ही सभागृहांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, गौतम बुध्दांचे सारनाथ येथे मोठे भव्य स्मारक आहे. त्या ठिकाणी देशातून आणि परदेशातून अनेक लोक भेट देण्यासाठी येतात. तशाच प्रकारचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे देदीप्यमान, जगाला प्रकाश मिळेल, जगाचे लक्ष आकर्षित करील अशाप्रकारचे स्मारक माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली उभे करावे अशी मी विनंती करतो आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी जागा दिल्याबद्दल आपणास वंदन करतो, मुजरा करतो, नतमस्तक होतो एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये इंदू मिलच्या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासंबंधी जो प्रस्ताव आणलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी काल देखील विनंती केली होती आणि आजही विनंती करीत आहे की, या विषयावर सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत. मला माहीत आहे की, सभागृहाचे कामकाज नियम, प्रथा व परंपरा यावर चालते. परंतु अशाप्रकारच्या राज्यव्यापी आणि देशव्यापी चर्चा खूप कमी वेळा होतात. तेव्हा मी दहा-पंधरा मिनिटे बोललो आणि अन्य सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यास फक्त दोन-चार मिनिटे मिळाली तर ते योग्य होणार नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, हा एक ऐतिहासिक निर्णय आहे. दोन्ही सभागृहांनी त्यावर निर्णय घेतलेला आहे. दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या प्रश्नासंबंधी सर्व पक्षांच्या नेत्यांनी आपले मतभेद बाजूला ठेवून सर्वजण एकत्र येऊन केंद्र सरकारकडे गेले हे खरे आहे. त्याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी जी काही वक्तव्ये झाली, त्या वक्तव्याबद्दल मला जी काही माहिती आहे ती मी देऊ शकलो नाही तर त्याला अर्थ राहणार म्हणून मी त्या गोष्टींचा उल्लेख करणार आहे. हा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणण्यात आला आहे काय असे वक्तव्य करण्यात आले. ते वक्तव्य दुर्दैवी आहे, हे मी तेव्हाही सांगितले आणि आताही तेच सांगत आहे. त्याचे कारण असे की, या लोकशाहीमध्ये अशाप्रकारच्या ऐतिहासिक घटना घडतात त्या मागे फार मोठा इतिहास असतो आणि तो तुम्हा आम्हाला टाळता येणार नाही.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

1947 सालापासून आजपर्यन्तच्या अनेक घटना पाहिल्या तर त्याबाबतचा निर्णय तात्कालिक होऊ शकेल असे आपल्याला वाटत असले तरी त्या गोष्टी तात्कालिक नव्हत्या म्हणून त्याच्या पाठीमागे फार मोठा इतिहास आहे. हे सांगत असतांना आमच्या काही सन्माननीय सदस्यांनी त्यांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. मी त्यांचे लक्ष एका गोष्टीकडे आकर्षित करतो, आपले सुध्दा लक्ष आकर्षित करतो. इंदू मिलच्या जागेचा लढा किंवा संघर्ष हा आजचा नसून 1998 सालापासून आहे. 1998 साली या राज्यामध्ये सत्तांतर झाले होते तसे दिल्लीमध्ये सुध्दा सत्तांतर झाले ते 2004 सालापर्यन्त होते. त्यावेळी तुम्हाला निर्णय घेण्यासाठी कुणी अडविले होते? त्यावेळी सीआरझेडच्या बाबतीत तुम्हाला कुणी अडविले होते. 1991 साली सीआरझेड लागू झाल्यानंतर सीआरझेड-2 अंमलात आला, त्यानंतर एमसीझेड लागू झाला. हे सर्व कायदे महाराष्ट्रामध्ये झाले आहेत. ही तांत्रिक गोष्ट आपण म्हणत आहात पण त्यामध्ये नक्की तांत्रिक काय आहे? ज्याला आपण बुध्दीभेद म्हणतो ते करण्याचा प्रयत्न आपण कृपया करु नये अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या राज्याच्या, देशाच्या आणि जगाच्या दृष्टीने एवढा मोठा निर्णय झाला आहे तो आपण मोठया मनाने स्वीकारला पाहिजे असे एक सर्व सामान्य सदस्य म्हणून माझे मत आहे. यामध्ये तांत्रिक गोष्टींचा आधार घेऊन काही विद्वान माननीय सदस्यांनी सांगितले की, तेथील टीडीआर बाजारभावाने विकला जाणार आहे. याबाबत मी आपणास एक गोष्ट नम्रपूर्वक सांगू इच्छितो की, लोकशाही स्वीकारलेल्या सरकारमध्ये या सर्व प्रकिया आपल्याला स्वीकाराव्या लागतात. त्या बाबतीत सरकार काही निर्णय घेते, किंवा कायद्यामध्ये शिथिलता आणते. इतकेच नव्हेतर लोकांचा रेटा लक्षात घेऊन कायद्यातील अनेक गोष्टींना बगल देऊन निर्णय घेतला जातो. असा निर्णय या राज्यामध्ये आणि या देशामध्ये अनेक वेळा घेतला गेला आहे.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

सभापती महोदय, मी आपल्या माहितीसाठी सांगतो. ज्या गोष्टींचा या ठिकाणी ऊहापोह करण्यात आला तसे काहीही घडले नाही व तसे समजण्याचे कारण नाही. एनटीसीच्या जमिनीच्या बाबतीत इंडस्ट्रियल ॲक्टमधील कलम 154 मध्ये तशीच तरतूद आहे, त्या कलमातील तरतूद अजूनही काढण्यात आलेली नाही. त्या बाबतीत कायदेशीर प्रक्रिया पार पाडीत असतांना कलम 37(अ)(अ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

अंतर्गत नागरिकांच्या सूचना किंवा सजेशन्स आपल्याला मागवाव्या लागतात. या स्मारकाला कुणाचा विरोध असेल तर तो नोंदविण्यास आपल्याला कुणी अडविले आहे? अशाप्रकारची कायदेशीर प्रक्रिया आपल्याला पार पाडावी लागते. सभापती महोदय, याकरिता झालेल्या आंदोलनाच्यावेळी आंदोलकांवर काही गुन्हे दाखल करण्यात आले त्याबाबत सुध्दा सभागृहामध्ये सांगितले गेले. त्याबाबत पोलिसांनी त्यांची कारवाई करावयाची नाही काय? राज्य सरकारने त्याबाबत दखल घेऊन एन्क्रोचर म्हणून तुम्हाला तसे काही करता येणार नाही असे सांगितले. त्याबाबत जर एखाद्याविरुध्द कारण नसतांना गुन्हा दाखल केला गेला तर त्यासाठी कलम 169 मध्ये तरतूद आहे. कायद्यामध्ये असलेल्या तरतुदीचे आपण पालन करु नका अशाप्रकारचा युक्तिवाद तुम्ही या ठिकाणी करीत आहात, अशाप्रकारच्या तांत्रिक गोष्टी या ठिकाणी सांगून बुध्दिभेद केला जात आहे ही गोष्ट योग्य नाही. या करिता मला मुद्दाम या ठिकाणी सांगावे लागत आहे की, अगोदर आपल्याला कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागते व त्यानंतर बाकीच्या सर्व गोष्टी कराव्या लागतात.

सभापती महोदय, या मुद्याला धरुन या ठिकाणी माननीय सदस्यांनी कॅगचा उल्लेख केला. आपल्या देशामध्ये लोकशाही अस्तित्वात येऊन 65 वर्षे झाली आहेत. आपल्या देशाचा राज्यकारभार कशापध्दतीने चालतो, राज्याचा कारभार कशापध्दतीने चालतो, एखाद्या विभागाचा कारभार कसा चालतो हे पाहण्यासाठी एक संविधानिक बॉडी निर्माण करण्यात आली आहे तिला कॅग म्हटले जाते. त्या कॅगच्या चौकटीमध्ये काम करीत असतांना काही अयोग्य निर्णय घेतले गेले असतील तर त्याचे रिफ्लेक्शन किंवा त्याचा ऊहापोह कॅगच्या अहवालामध्ये येतो. हीच तांत्रिक बाब समोर ठेवून अनेक वेळा गोंधळ घातला जातो याबाबत मी आपल्या माहितीसाठी एकच उदाहरण सांगतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . . .

सभापती महोदय, कॅगचा मुद्दा संविधानिक असल्यामुळे त्या बाबत मी जास्त वक्तव्य करणार नाही. कारण मी या सदनामध्ये बोलत असल्याने मला जबाबदारीची जाणीव आहे.परंतु मी एकच उदाहरण सांगू इच्छितो की, स्व.राजीव गांधी यांच्या वेळेला बोफोर्सच्या बाबतीत तत्कालीन कॅग आणि श्री.व्दिवेदी यांनी रिपोर्ट दिला आणि त्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर भारतीय जनता पक्षाने त्यांची राज्यसभेवर तत्काळ नियुक्ती केली. पण केवळ तेवढ्यावर थांबले नाही तर नंतर त्यांची नियुक्ती कर्नाटक राज्याचे राज्यपाल म्हणून करण्यात आली.कॅगच्या बाबतीत सांगावयाचे तर ते काही परमेश्वर नव्हे तर ती देखील माणसे आहेत. अशा प्रकारे राजकारणासाठी कॅगचा दुरुपयोग केला जात असेल आणि तशा प्रकारचा दुरुपयोग जर कोणी या स्मारकाच्या बाबतीत केला तर तो आम्ही खपवून घेणार नाही. हे स्मारक झाले पाहिजे. याठिकाणी साडेबारा एकराच्या बाबतीत सांगण्यात येत आहे पण प्रत्यक्षात काही काळापूर्वी चार एकराबाबत सांगितले होते हे समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांना आठवत आहे काय? या सर्व गोष्टी सदनामध्ये मांडलेल्या आहेत. आम्ही या सगळया गोष्टींवर पडदा टाकण्यास तयार आहोत.कारण ज्याचा शेवट गोड असतो ते सर्वांनी गोड करुन घेतले पाहिजे.

सभापती महोदय, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एका समाजामध्ये जन्मले आणि त्यांनी एका समाजासाठीच काम केले असे समजण्याचे कारण नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगभरामध्ये, देशामध्ये, राज्यामध्ये मानवतेचे काम केले हे तुम्हाला आणि आम्हाला नाकारता येणार नाही. म्हणून याठिकाणी काही गोष्टींचा उल्लेख करीत असताना मला मुद्दाम सांगावयाचे आहे की, 1998 सालापासून हा मुद्दा ऐरणीवर होता आणि त्याबाबत उल्लेखही करण्यात आला. सभापती महोदय, आपल्यालाही माहिती आहे की, कॉंग्रेस पक्षाची जी जाहीरनामा कमिटी आहे त्या कमिटीचा मी अनेक वर्षापासून सदस्य आहे. 2004 आणि 2009 या दोन्ही वर्षी पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये हा मुद्दा प्रामुख्याने आणि प्रकर्षाने मांडण्याबाबत आपण सर्वांनी निर्णय घेतला. त्यामुळे काहीतरी तिकडे शिजले, काहीतरी आमच्या लक्षात आले आणि नंतर आम्ही ती बाब मॅनिफॅस्टोमध्ये समाविष्ट केली असे काही झाले नाही. याबाबत उल्लेख करण्यात आला होता त्यामुळे मी हे मुद्दाम सांगावयाचे आहे.या विषयाच्या अनुषंगाने ज्या काही तांत्रिक गोष्टी असतील त्याबाबत माननीय मंत्री महोदय उत्तर देतील. पण मोठे आश्चर्य वाटले की, सदरहू स्मारक कसे

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . . .

चांगले व्हावे, भव्य कसे व्हावे जेणेकरुन जगभरामध्ये त्याचे पावित्र्य कसे कायम राहील याबाबतीत एकही सूचना विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून आली नाही. हे तांत्रिकदृष्ट्या चुकीचे आहे, सदरहू काम आणखी कसे रखडेल

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी कोणाचेही नाव घेतलेले नाही.

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझे भाषण रेकॉर्डवर आहे आणि तेथे नालंदा, तक्षशीला यासारखे विद्यापीठ झाले पाहिजे. तसेच पाली भाषेचे विश्व विद्यापीठ झाले पाहिजे इ.जवळजवळ 50 सूचना मी केलेल्या आहेत असे असताना सन्माननीय सदस्य असे सांगत आहेत की, विरोधी पक्षाकडून कोणत्याही सूचना करण्यात आल्या नाहीत हे त्यांचे असत्य विधान असून ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी असे म्हटले आहे की, विरोधी पक्षाच्या कोणत्याही सन्माननीय सदस्यांकडून अशा प्रकारची सूचना आली नाही. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विजय गिरकर उभे राहिले आणि त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, मी तुमचे नाव घेतलेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे. मला हे समजून घेण्याची इच्छा आहे की, काँग्रेस पक्षा व्यतिरिक्त या सदनामध्ये असलेले सर्वच्यासर्व सन्माननीय सदस्य हे विरोधी आहेत काय ? मग सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे असतील किंवा राष्ट्रवादी पक्षाचे सन्माननीय सदस्य असतील. त्यांच्या बोलण्यातून अशा प्रकारचा अर्थ अभिप्रेत होत असल्याने याबाबतीत नक्की विरोधक कोण हे त्यांनी येथे सांगितले पाहिजे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, बुध्दीभेद हा त्यांचा स्थायी स्वभाव असल्यामुळे एखाद्या वाक्यामध्ये कसा बुध्दीभेद करावयाचा याचाही त्यांनी प्रयत्न करुन पाहिला पण त्याचा उपयोग झाला नाही. त्याचे कारण असे की, मी स्पष्टपणे विरोधी बाकावरच्यांना असे म्हणालो आणि आपण विरोधी बाकावर रहावे अशी आमची कायम इच्छा आहे.आपण अतिशय चांगले भाषण करीत असता, विषयांची चांगल्या प्रकारे मांडणी करीत असता, सरकारला धारेवर घरता आणि ते कायम स्वरुपी तसेच करीत रहा अशी आमची इच्छा आहे.

. . . .एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . . .

सभापती महोदय, या अतिमहत्वाच्या ऐतिहासिक निर्णयाच्या दृष्टीने मला काही गोष्टींबाबत मुद्दाम सूचना करावयाच्या आहेत. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाबाबत चर्चा करीत असताना होय, हे खरे आहे की, यामध्ये अनेक गोष्टी अंतर्भूत केलेल्या आहेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ...

परंतु आणखी काही गोष्टी कराव्या लागतील, असे माझे स्वत:चे मत आहे. मला ते माहीत आहे कारण या संदर्भात जेव्हा प्रेझेंटेशन झाले त्यावेळी श्री. आनंदराज आंबेडकर, रामभाऊ पंडागळे, सुभाष चव्हाण आणि मी स्वत: उपस्थित होतो. काही सन्माननीय सदस्य श्री. विजय कांबळे यांचा उल्लेख करीत आहेत पण श्री. विजय कांबळे प्रेझेंटेशनच्या वेळी उपस्थित नव्हते. श्री. विजय कांबळे यांनी ही चळवळ चालविली हे खरे आहे. कारण ते कामगार नेते आहेत. कष्टकऱ्यांचे नेतृत्व करणारे ते आमचे सहकारी आहेत परंतु प्रेझेंटेशनच्या वेळेला ते उपस्थित नव्हते. सुधारणेच्या बाबतीत बोलत असताना मी सांगू इच्छितो की, प्रेझेंटेशनच्या वेळेला काही गोष्टी अंतर्भूत केलेल्या आहेत. जगभरातून आंबेडकरी चळवळीचा अभ्यास करण्यासाठी येणाऱ्या सर्व लोकांना अभ्यास करण्याची संधी प्राप्त व्हावी या हेतूने त्या ठिकणी 10 हजार पुस्तकांचे एक मोठे ग्रंथालय असणार आहे. एक ऑडिटोरियम असणार आहे. आणखी काही गोष्टी त्यामध्ये अंतर्भूत केलेल्या आहेत.

सभापती महोदय, त्या ठिकाणी 6 डिसेंबरला जवळजवळ दोन तीन दिवस लाखोच्या संख्येने आंबेडकरी जनता आणि इतर जनता अभिवादन करण्यासाठी येते. त्यावेळी शिवाजी पार्क किंवा तेथील चौपाटीचा जो भाग आहे त्या ठिकाणी अतिशय वाईट परिस्थिती असते. या बाबतीत महानगरपालिकेच्या काही मर्यादा आहेत. 8 लाख, 10 लाख, 15 लाख लोक आल्यानंतर त्यांना ऐनवेळी नागरी सुविधा पुरविणे फार कठीण होते. त्या ठिकाणी साडेबारा एकर जागेपैकी फार कमी जागेमध्ये बांधकाम केले जाणार आहे कारण तेवढेच अनुज्ञेय आहे. मी 1.33 एफएसआय च्या बाबतीत नंतर बोलणार आहे. कारण तो महत्वाचा विषय आहे. परंतु त्या ठिकाणी दोन तीन दिवस खेडेगावातून येणाऱ्या ज्या महिला असतात त्यांची त्या भागामध्ये फार कुचंबणा होणे. त्यामुळे त्या ठिकाणी येणारे जे लोक आहेत त्यांना आवश्यक असणाऱ्या ज्या टॉयलेट, आंघोळीची सुविधा, नाश्त्याची सुविधा अशा पायाभूत सुविधांचा अंतर्भाव त्या स्मारकामध्ये करणे आवश्यक आहे. त्यासाठी 10 खोल्या बांधा, 20 खोल्या बांधा असे मी म्हणणार नाही. कारण त्या ठिकाणी लँड स्केपिंग होणार आहे अशा प्रकारचे प्रेझेंटेशन होते आणि ते चांगले आहे. पण कोठे तरी इमारती बांधा असे आमचे अजिबात म्हणणे नाही. पण हे होत असताना ज्या पायाभूत नागरी सुविधा आहेत त्या सुध्दा त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात असाव्यात अशी माझी विनंती राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D

श्री. भाई जगताप ....

सभापती महोदय, एक गोष्ट आमच्या मित्रांनी सांगितली की, 1.33 प्रमाणे साडेपाच लाख जो काही एफएसआय होतो तो बाजारामध्ये विकला जाणार आहे. आमचे मंत्री महोदय त्यांच्या उत्तरात याबाबत सांगतीलच पण मला जे काही आकलन आहे किंवा मला जे काही कळते त्यावरुन मी नम्रपणे सभागृहाच्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, राज्य शासनाने कोणत्याही प्रकारचे पैसे वगैरे दिलेले नाहीत. जे अधिकारक्षेत्रामध्ये आहे त्या माध्यमातून जो टीडीआर दिलेला आहे तो एनटीसीला फक्त त्यांच्याच प्रॉपर्टीवर लोड करता येईल. तो टीडीआर त्यांना दुसरीकडे कोठेही वापरता येणार नाही असा आपण कायदा केलेला आहे. त्यामुळे ते टीडीआर घेऊन बाजारामध्ये जातील असे समजण्याचे कारण नाही. एनटीसीने त्यांच्या प्रॉपर्टीचे काय करावे हा त्यांचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी दोन गोष्टींचा उल्लेख करावासा वाटतो तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामभाऊ पंडागळे यांनाही विनंती करावीशी वाटते. आपण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सभागृहात उल्लेख करतो. हे आपण सर्व करतो परंतु त्यांचे जे मूळ आंबेडवे गाव आहे त्या ठिकाणी किती सन्माननीय सदस्य गेले आहेत हे मला माहीत नाही. काही सन्माननीय सदस्य त्या गावात गेले आहेत हे मला माहीत आहे. मी त्या गावातील आहे. त्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर गेले होते. आम्ही कार्यक्रम घेतला. आम्ही त्या ठिकाणी शाळा सुरु केली. त्या ठिकाणी सर्वात आधी मी पुढाकार घेतला. आपण सगळ्यांनी पुढाकार घेतला आणि खूप चांगले काम केले. त्या ठिकाणी श्री. विधाते सरांनी शाळा सुरु केली. त्यांना मी परवानग्या आणून दिलेल्या आहेत. त्या ठिकाणी शाळा बांधावयास सुरुवात केली त्याचा पहिला वर्ग भाई जगताप यांनी सुरु केलेला आहे. ते माझे कर्तव्य आहे. माझे काजव्यासारखे आहे. या ठिकाणी एका सूर्याचे वर्णन करीत असताना आम्ही काजव्यासारखे आहोत.

माझी अशी विनंती आहे की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एवढे मोठे आंतरराष्ट्रीय स्मारक या ठिकाणी होत असताना त्यांचे जे मूळ आंबेडवे गाव आहे ते उपेक्षित राहता कामा नये. खऱ्या अर्थाने पंढरपूर त्याच ठिकाणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म मोहू येथे झाला हे खरे आहे पण हे त्यांचे मूळ गाव आहे. त्या ठिकाणी त्यांचे नातेवाईक आहेत. सर्व आंबेडकर कुटुंब त्या ठिकाणी आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

माझी विनंती आहे की त्यांचे आंबेडवे हे मूळगाव देखील आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे. दुसरे वणवा हे रमाबाई आंबेडकराचे मूळगाव आहे. ही एका तालुक्यातील गावे आहेत. ही उपेक्षित राहिलेली गावे आहेत. या गावांचा विकास झाला पाहिजे. काही सामाजिक संस्थांनी या गावांचा विकास करण्याचा प्रयत्न केला, आम्ही देखील तो प्रयत्न केला. आता आपण इंदू मिलच्या जागी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक करीत आहोत. उद्या एखाद्या प्रतिष्ठीत नागरिकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाबाई आंबेडकर यांच्या मूळ गावी जावेसे वाटले तर तो कुठे जाईल ? तेव्हा आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक करीत आंबेडवे व वणवा ही गावे त्यामध्ये समाविष्ट कशी करता येतील या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करु या. सभापती महोदय, आपण मला या विषयावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र. जय भीम.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, इंदू मिलच्या जागी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक करण्यासंबंधी मांडण्यात आलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला त्याबद्दल केवळ दलित समाजालाच नाही तर संपूर्ण भारतीय समाजाला आनंद झालेला आहे. या निमित्ताने मी या सभागृहाला विनंती करु इच्छितो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज हे एका विशिष्ट समाजाचे नेते म्हणून प्रस्थापित होतील अशा प्रकारची भाषा कुणी करता कामा नये. उशिरा का होईना महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होत असल्यामुळे संपूर्ण भारतीय समाजाला आनंद झालेला आहे. या स्मारकासंबंधी तांत्रिक मुद्दे उपस्थित करु नयेत अशी काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केली. तांत्रिक मुद्दे उपस्थित केल्याने स्मारक होण्यास अडचणी निर्माण होतील अशी यामधील भीती नसून आपण सर्वांनीच हे स्मारक लवकरात लवकर कसे होईल हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी तांत्रिक कारणामुळे अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकांची कामे रेंगाळलेली आहेत असे सांगितले. मी याचे एक उदाहरण देतो. शासनाने अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक करण्याचा निर्णय घोषित केला होता. मग शासनाने हिंमत करुन सर्व प्रकारच्या तांत्रिक अडचणीवर मात करुन हे स्मारक करण्याचा प्रयत्न का केला नाही ? सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांचे म्हणणे असे आहे की, कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी असल्या तरी त्यावर मात केली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक कोणत्याही तांत्रिक अडचणीमध्ये अडकणार नाही असा प्रयत्न आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या वेळी भारतातून लाखो लोक चैत्य भूमीवर येत असतात. तेथे येणा-या भाविकांसाठी सोईसुविधा नाहीत. त्या सोईसुविधा देखील व्हाव्यात अशी माझी सूचना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दैन्य आणि दारिद्र्याशी सामना करीत आपले शिक्षण पूर्ण केले, त्यांनी वाचन आणि चिंतनावर भर दिला. म्हणून वाचन आणि चिंतनाला प्रोत्साहन मिळेल असे केन्द्र तेथे उभारावे अशी माझी सूचना आहे. मिळालेली जमीन किती कोटीची आहे हा मुद्दा नाही. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी असा मुद्दा

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पंडित....

उपस्थित केला की, शेवटी एनटीसी ही केन्द्र सरकारचीच संस्था आहे. केन्द्राने टीडीआरचा आग्रह न धरता स्मारकासाठी मोफत जागा द्यायला पाहिजे. या जमिनीची किंमत 5 हजार कोटी पेक्षा अधिक होत असेल तर ती रक्कम कशी उपलब्ध होणार ? अशा प्रकारच्या स्मारकासाठी निधी घोषित झाला तरी अनेक वर्षे तो प्राप्त होत नसल्यामुळे प्रकल्पाची किंमत किती तरी पटीने वाढते, प्रकल्प रेंगाळत राहातो. प्रकल्प कसे रेंगाळतात याचे मी एक उदाहरण देतो. छत्रपती शाहू महाराजांच्या जन्मस्थळाचा विषय हा 10 कोटीचा आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

तर त्या कामासाठी गेल्या 5 ते 6 वर्षापासून कधी 1 कोटी, कधी 50 लाख, कधी 25 लाख एवढा कमी निधी उपलब्ध करुन दिला जातो आहे. आता शाहू महाराजांच्या जन्मस्थळाच्या स्मारकाची किंमत किती तरी पटीने वाढली आहे. सध्या ते काम अर्धवट स्थितीत आहे. हा विषय ऐरणीवर आहे. शासन 10 कोटीच्या प्रकल्पासाठी एका अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध करुन देऊ शकत नसेल तर आपण ज्या 5 हजार, 10 हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांच्या कल्पना करतो आहोत, त्यासाठी निधी कशा प्रकारे उपलब्ध करुन दिला जाणार आहे या गोष्टींचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक होण्यासाठी शासनाने जागा उपलब्ध दिली आहे, परंतु तो सरकारी प्रकल्प न होता यासंबंधी जे प्राधिकरण स्थापन केले जाणार आहे, त्यामध्ये सर्व मान्यवरांना सहभागी करुन घेतले जावे अशा प्रकारची मी शासनास विनंती करतो आणि या विषयासंबंधीचे माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रस्ताव असून त्यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. हा अतिशय ऐतिहासिक निर्णय झालेला आहे. हा प्रस्ताव कालच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये सकाळी आणि दुपारी दाखविलेला होता. आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये फक्त सकाळीच हा प्रस्ताव दाखविलेला आहे. या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांना अजून बोलावयाचे आहे. त्या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मते मांडू दिली नाहीत तर त्यांच्यावर अन्याय केल्या सारखे होईल. पर्यायाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सुध्दा अन्याय होईल. हा प्रस्ताव सकाळी संपला नाही तर त्या प्रस्तावावरील चर्चा दुपारी घ्यावी किंवा उद्या सकाळी घ्यावी अशी माझी विनंती आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत, आम्हाला शासनाचे अभिनंदन करावयाचे आहे. म्हणून माझ्या सूचनेचा विचार करण्यात यावा अशी माझी आपणाला पुन:श्च विनंती आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण व इतर सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव सभागृहात मांडला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

या प्रस्तावावर चर्चा करण्याची आम्हा सर्वांना संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल सर्वप्रथम मी माननीय सभापतीचे आभार मानतो. महाराष्ट्रात एखादा ऐतिहासिक निर्णय झाला तर त्या निर्णयाच्या संघर्षाच्या बाबतीत खूप चर्चा होत होती. परंतु निर्णय झाल्यानंतर, तो निर्णय घेण्यासाठी जो प्रवास झालेला असतो, त्या प्रवासावर आपण लक्ष केंद्रीत केलेले नाही. हा खूप महत्वाचा असा ऐतिहासिक निर्णय झालेला आहे. विधानसभा आणि विघानपरिषदेतील सदस्यांनी या विषयाच्या अनुषंगाने एकमुखी ठराव मंजूर पारित केला. त्या एकमुखी ठरावामुळे या बाबतचा निर्णय घेण्यास एक शक्ती, एक बळ प्राप्त झाले, त्यामुंळे मी दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, विशेषत: हा निर्णय घेण्यासंबंधी स्टेटस्मन टाईप लिडरशीप, मुत्सद्दीपणा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दाखविला आणि त्यांचे निर्णय क्षमतेचे कौशल्य या निर्णयाच्या माध्यमातून दाखवून दिले. ते तीन दिवस दिल्ली येथे मुक्काम ठोकून होते ही बाब देशातील जनतेने पाहिली आहे. प्रत्येक अडचण, प्रत्येक हर्डल्स, प्रत्येक आब्टेकल्स त्यावर मात करण्यासाठी सर्वांचे सहकार्य घेऊन, सर्वांशी समन्वय साधण्याचा ते प्रयत्न करीत होते. आपल्या सर्वांच्या वतीने मी माननीय मुख्यमंत्री महोदय श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे विशेष अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मी एक गोष्ट आवर्जून निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, हा निर्णय झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टेटमेंट केले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी केंद्र सरकारने जागा देण्याचा निर्णय घेतला आहे. हा ऐतिहासिक व समतेचा संदेश देणारा निर्णय आहे. महाराष्ट्रापुरताच नव्हे तर देशाच्या अभिमाना संबंधीचा हा निर्णय आहे. यानंतर त्यांनी स्टेटमेंटमध्ये असेही म्हटले की, ही जागा मिळाल्यामुळे सगळयांना आनंद झालेला आहे. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले आहेत. म्हणून कृपया या विषयाच्या बाबतीत कोणीही राजकारण करु नये. माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय मोठेपणा दाखविला आहे. हा निर्णय होणे खूप अडचणीचे होते. परंतु सर्वांची भावना होती की, या विषयाचा निर्णय 6 डिसेंबर पूर्वी झाला पाहिजे. तो निर्णय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त...

डिसेंबर पूर्वी होणे शक्य नव्हते. परंतु जी गोष्ट शक्य नव्हती, ती गोष्ट माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुन पॉझिटिव्ह निर्णय घेऊन पदरात पाडून घेऊन ती गोष्ट शक्य करुन दाखविली. मला सभागृहात आवर्जून सांगावयाचे आहे की, या निर्णयाचा इम्पॅक्ट आपल्या राज्यातच नव्हे तर इंटरनॅशनल लेव्हलवरही झाला.

महोदय, माझ्या शाळेतील एक वर्ग मित्र आहे. त्याचे नाव श्री. कैलास शिंदे असे आहे. तो युएसए मधील सॅन फ्रॉन्सिको या शहरात आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त.....

त्याने मला ई-मेल पाठविला. अमेरिकेमध्ये सुध्दा या निर्णयाविषयी वृत्तपत्रामध्ये बातम्या प्रसिध्द झाल्या. दुसरा एक माझा कॉलेज मित्र जो ऑस्ट्रेलियामध्ये राहतो. त्यानेही मला ई-मेलवर या निर्णयाबाबत आनंद व्यक्त करणारा संदेश पाठविला. आपल्या देशाविषयी विश्लेषण करताना Unity is our strength असे केले जाते. फार मोठे सर्वपक्षीय ऐक्य, पाठबळ माननीय मुख्यमंत्र्यांना लाभले. निश्चितपणे हा निर्णय लवकर होण्यासाठी मदत झाली.

हा निर्णय करताना माननीय मुख्यमंत्र्यांनी उल्लेख केला की, आमच्या कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा माननीय श्रीमती सोनीयाजी गांधी, श्री.राहुलजी गांधी, माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग, केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार आणि केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री श्री.आनंद शर्मा यांचे आम्ही सर्वांनी आभार मानले पाहिजेत. हा निर्णय खूप वर्षापासून प्रलंबित होता. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि सध्याचे केंद्रीय गृहमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण व स्व.विलासराव देशमुख यांचे सुध्दा मला आभार मानायचे आहेत. त्यांनी देखील त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत या संदर्भात प्रयत्न केले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार, कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.माणिकराव ठाकरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.मधुकरराव पिचड यांनी देखील या प्रश्नाबाबत प्रयत्न केले होते. आता यापुढे भव्यदिव्य स्मारक उभे करण्याबाबत लक्ष केंद्रीत केले पाहिजे. संपूर्ण जगाला आकर्षण ठरु शकेल अशा प्रकारचे स्मारक तातडीने उभारले पाहिजे. या ऐतिहासिक निर्णयाचा बोध घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारकाच्या कामाला गती देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि राज्य सरकारने प्रयत्न करावेत. राज्याच्या हिताचे जे जे विकासात्मक प्रकल्प आहेत त्यासाठी माननीय मुख्यमंत्री केंद्र स्तरावर दिल्लीमध्ये जाऊन प्रयत्न करीत आहेत. मुख्यमंत्री जी, आप आगे बढिये, पूरा राज्य आपके साथ है. बाकी के भी जो प्रोजेक्ट्स हैं, उनको भी आप इसी तरह से जल्दी से जल्दी महाराष्ट्र को लाकर दीजिए.

धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भीम.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या जागेचा प्रश्न माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली तडीस लागला आणि एक फार मोठे काम या राज्यामध्ये पार पडले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचा हा विषय हा कोण्या एका राज्याचा किंवा कोण्या एका पक्षाचा नाही. जगाच्या इतिहासामध्ये मानवतेसाठी संघर्ष करणाऱ्या एका महामानवाचा हा विषय आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे काही एका समाजाचे नेते नव्हते किंवा काही ठरावीक वर्गासाठी चळवळ करणारे लढवय्ये नव्हते. संपूर्ण भारत देश काहीतरी जीवनमूल्ये घेऊन जगावा अशी त्यांच्या विचाराची दिशा होती.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संपूर्ण संघर्षमय जीवनाकडे जेव्हा आपण बघतो त्यावेळेला एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, जेव्हा राजकीय स्वातंत्र्याची चळवळ सुरु होती आणि इंग्रज आपल्या देशावर राज्य करीत होते त्यावेळी एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे म्हणणे होते की, राजकीय स्वातंत्र्याची लढाई ही सामाजिक स्वातंत्र्याच्या लढाईपेक्षा सोपी होती.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ...

कारण, समोर दिसणाऱ्या शत्रूला मारणे फार सोपे असते, त्याला मारण्याचे अनेक मार्ग असतात. मग तो मार्ग रक्तरंजित हिंसेचा असो किंवा अहिंसेचा. शत्रूशी लढतांना 'मारा किंवा मरा' असाच मार्ग स्वीकारावा लागतो. पण समाजातील जो स्वकीय शत्रू होता, तो प्रत्यक्ष समोर दिसतच नव्हता. तो 100-125 वर्षाचा नव्हता तर हजारो वर्षाचा होता. तो स्वकीयांच्या मेंदूत बसला होता. तो शत्रू म्हणजे, या देशातील जातीयवाद आणि वर्णव्यवस्था.

सभापती महोदय, या देशात एवढा मोठा संघर्ष ज्या महामानवाने उभा केला, त्या महामानवाचे चिरंतन स्मरण समाजाला रहावे, त्यांच्या विचारांची शिदोरी भावी पिढयांना कायम मिळत रहावी, यासाठी काही तरी भव्यदिव्य होण्याची नितांत आवश्यकता आहे. सर्वच राज्यकर्त्यांना असे वाटते की, आपल्याला जेव्हा राज्य करण्याची संधी मिळेल, तेव्हा आपल्या कारकिर्दीत काही तरी भव्यदिव्य घडावे आणि त्याची नोंद शतकानुशतकापर्यंत घेतली जावी. अशाच प्रकारची एक चांगली संधी या निमित्ताने सध्याच्या राज्यकर्त्यांना मिळालेली आहे. आपल्या कार्यकाळात भव्यदिव्य मॉन्युमेंटरी क्रिएशन म्हणता येईल, अशा पध्दतीच्या एका स्मारकाची उभारणी करण्याची संधी आपल्या समोर आली आहे.

सभापती महोदय, या चर्चेत भाग घेतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी इंदू मिलची जागा कोणाची आहे, किती आहे, कशी मिळवली, किंमत किती आहे, या स्मारकासाठी काय काय लागणार आहे, कोणत्या अडचणी येणार आहेत, या संदर्भातील भावना व्यक्त केल्या आहेत. मला असे वाटते की, जागतिक पातळीवर जेथे जेथे अशा प्रकारचा संघर्ष उभा राहिला व त्या संघर्षाचे नेतृत्व करणारी जी मंडळी होती, त्यांच्या स्मारकांना भेटी देणाऱ्यांच्या मनात जी संवेदना निर्माण होते, तशाच प्रकारची संवेदना निर्माण करणारे स्मारक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे निर्माण झाले पाहिजे. हे स्मारक म्हणजे केवळ एखादी इमारत किंवा एखादा भव्य पुतळा ठरता कामा नये. हे स्मारक यासाठी निर्माण करावयाचे आहे की, तेथे जाणाऱ्या प्रत्येक माणसाने या स्मारकाकडून स्फूर्ती घेतली पाहिजे. त्यांच्या मनात हे विचार आले पाहिजेत की, त्यावेळी काय झाले होते, काय केले होते आणि आता काय केले पाहिजे, समाजाचे एकीकरण कशा प्रकारे आपण घडवून आणू शकू.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ...

सभापती महोदय, या स्मारकाची उभारणी करतांना अनेक प्रस्ताव सरकारकडे येतील. अनेक लोक सूचना करतील. या स्मारकासाठी आपण जगातील सर्वश्रेष्ठ वास्तूशास्त्रज्ञ आणू, जगातील सर्वोत्तम बांधकाम साहित्य आणू, त्यामधून स्मारकाची उभारणी होईल. ही उभारणी चांगल्या प्रकारची होईल, ही एवढी अवघड गोष्ट नाही. परंतु, डॉ.बाबासाहेबांचा विचार ज्यांच्या मनात खोलवर रुजला आहे, त्यांच्या विचारांशी ज्यांची बांधिलकी आहे, या विचारांवर ज्यांना पुढचे मार्गक्रमण करावयाचे आहे, अशा सर्वांच्या मनातील संकल्पना जर स्मारक रचनाकारांना समजल्या नाही तर भव्यदिव्य स्मारक उभे राहिले तरी आपल्याला त्या भव्यदिव्य स्मारकात, स्मारकाचा आत्मा शोधूनही सापडणार नाही. त्यामुळे स्मारकाची उभारणी करीत असताना या महत्वूपर्ण बाबीची नोंद घेऊन त्याची पूर्तता करण्याच्या बाबतीतील दक्षता सरकारने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, स्मारकाच्या उभारणीसाठी कोणत्याही प्रकारची घाई केली जाऊ नये, अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे. या स्मारकाच्या माध्यमातून वर्ग संघर्षाचा जागतिक इतिहास चांगल्या प्रकारे मांडला गेला पाहिजे.

सभापती महोदय, मला स्मारकासंदर्भात एक संकल्पना मांडावीशी वाटते. ज्यावेळी मी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकात फिरत असेल तेव्हा माझ्या ठायी, माझ्या सोबत, क्षणोक्षणी परमपूज्य डॉ.बाबासाहेबांची सावली माझी साथ करीत आहे, अशी भावना माझ्या मनात निर्माण झाली पाहिजे. अशी भावना ज्यावेळी माझ्या मनात निर्माण होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने या स्मारकात आल्याचे समाधान मिळू शकेल.

सभापती महोदय, स्मारकासंदर्भात अनेक संकल्पना मांडता येतील. महात्मा गांधींनी आयुष्यभर केलेल्या संघर्षाचा उगम ते दक्षिण अफ्रिकेत असताना त्यांना रेल्वे गाडीतून बाहेर काढण्यातून झाला. डॉ.बाबासाहेबांचा संपूर्ण जीवनपट आपण उलगडून बघितला तर त्यात एक मजेशीर गोष्ट आपल्याला दिसून येईल. डॉ.बाबासाहेबांच्या संघर्षाचा उगम अशाच प्रकारच्या एका प्रसंगातून झाला आहे.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ...

डॉ.बाबासाहेब लहान होते. सन 1901 मध्ये दुष्काळग्रस्त भागात तलाव निर्मितीच्या कामावरील मजुरांना पगार वाटपाचे काम त्यांच्या वडिलांना देण्यात आले होते. डॉ.बाबासाहेब त्यांच्या वडिलांकडे जाण्यास निघाले होते. त्यावेळी त्यांच्याबरोबर त्यांचे भाऊ होते. ज्यावेळी गोरेगाव स्टेशनला त्यांची गाडी पोहोचली, त्यावेळी सायंकाळ झाली होती. खेडेगावात जाण्यासाठी त्यावेळी कोणतेही वाहन उपलब्ध नव्हते. या दोन लहान मुलांनी एका बैलगाडीवाल्याला घरापर्यंत सोडण्याची विनंती केली. गाडीवानाने ती मान्य केली. बैलगाडी बरीच पुढे गेल्यानंतर गाडीवानाने मुलांना विचारले की, "तुम्ही कोणाकडे जात आहात ?" त्यावेळी भीमरावांनी उत्तर दिले की, "आम्ही सुभेदार रामजी महाराकडे जात आहोत." हे उत्तर गाडीवानाने ऐकल्यानंतर आपली गाडी विटाळली, असे म्हणून रात्रीच्या वेळी या दोन लहान मुलांना गाडीतून उतरण्यास सांगितले.

यानंतर श्री. ओटवणेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

अशा काही घटना घडतात तेव्हा जीवनात संघर्ष उभा राहतो. जेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये जाण्याची संधी मिळाली तेव्हा त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना विनंती केली होती की, तुम्ही मला मंत्रिमंडळामध्ये घेणार असाल तर मला विधी खात्या ऐवजी नियोजन खाते द्यावे. तुम्ही मला नियोजन खाते दिले तर या देशात मी काही तरी चमत्कार करून दाखवितो. वर्ण व्यवस्थेवर आधारित असलेल्या समाजातील शेवटच्या घटकातील माणसाला न्याय मिळे पर्यंत नियोजन झाले तरच या देशामध्ये परिवर्तन होऊ शकेल. असा वैश्विक विचार देणाऱ्याला आपण परमेश्वर मानतो. पण परमेश्वर आहे की नाही हे मला माहीत नाही. तथापि, सत्य आणि सत्व याचे प्रतीक आपल्याला सापडेल अशी एक विभूती आपल्या महाराष्ट्रात होती, आपल्या देशात होती. त्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे काम अतिशय महत्त्वाचे आणि मोठे होते. त्या महामानवाचे होणारे स्मारक देखील त्याच पद्धतीचे असावे. त्याद्वारे त्यांना केवळ वंदन करून चालणार नाही, तर त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन एका नव्या समाज निर्मितीच्या दिशेने भक्कम पाऊल पुढे कसे पडेल हे पहावे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, सर्व सन्माननीय सदस्य या सर्वांनी जे प्रयत्न केले त्यातून आपण फार महान मानव शिल्प तयार करीत आहोत. या शिल्पाच्या उभारणीत सर्वांनी हातभार लावावा अशी आग्रहाची विनंती करतो मला संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी थांबतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, इंदू मिलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी देण्याचा ऐतिहासिक निर्णय केंद्र सरकारने घेतला. त्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे मी पहिल्यांदा अभिनंदन करतो.

सभापती महोदय, हे स्मारक डॉ.बाबासाहेबांच्या स्मृतीचे होता कामा नये. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या देशाचे भाग्यविधाते होते. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे स्वातंत्र्याची लढाई सोपी होती. पण समतेची लढाई अजून संपलेली नाही. जगातील अनेक समतेच्या लढायांमध्ये सगळ्यात कठीण अशी लढाई डॉ.बाबासाहेब आंबेडकर लढत होते. ज्या भूमीमध्ये माणसाच्या सावलीचा सुद्धा विटाळ होतो असे तत्त्वज्ञान होते त्या तत्वज्ञानाच्या विरोधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर उभे होते. जगामध्ये रंगावरून, वर्णावरून, भाषेवरून अनेक भेद झाले. पण कोण कोणत्या जातीत जन्मला, कोण कोणाच्या घरात जन्मला, यावरून भेद होण्याचा प्रकार फक्त या देशामध्ये होत होता. त्या विरोधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर उभे होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे या देशावर अनंत उपकार आहेत. ते केवळ दलित समाजाचे उद्धारक नव्हते. त्यांनी सबंध हिंदू समाजाला कर्दमातून बाहेर काढले. त्याना विषमतेच्या खाईतून बाहेर काढण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. या देशातील स्त्रियांना कधीच स्वातंत्र्य उपभोगता आले नव्हते. ते स्वातंत्र्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कोणतीही लढाई न करता या देशातील स्त्रियांना बहाल केले. या देशामध्ये 3 हजार वर्षे मनूचे विधान सुरू होते. ते मनूचे विधान बरखास्त करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. या देशाला असे संविधान दिले की, या देशातील सर्व भेदांना त्यामुळे एक क्षणात मूठमाती मिळाली. या देशातील सर्व विषमतेला एक क्षणात मूठमाती मिळाली आणि प्रत्येक माणसाला माणूसपणाचा अधिकार दिला तो या भारतातील संविधानाने. त्यामुळेच जगातील सर्वोच्च संविधान म्हणून भारतीय संविधानाचा उल्लेख होतो.

इंदू मिलच्या जागेवर जे स्मृतिशिल्प आपण उभारणार आहोत ते केवळ डॉ.बाबासाहेबांचे स्मारक होता कामा नये. तेथे डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचे प्रेरणाशिल्प उभे राहिले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या ज्या लढाया दिल्या त्यातून समाजातील नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, अशा पद्धतीचे शिल्प तेथे उभे केले पाहिजे. स्टॅच्यू ऑफ लिबर्टी सात आश्चर्यापैकी एक मानले जाते. इंदू मिलच्या जागेत महाराष्ट्र शासनाने स्टॅच्यू ऑफ इक्वॅलिटी उभी केली पाहिजे आणि या जगाला समतेचे तत्त्वज्ञान देणारे अप्रतिम, विराट, भव्यदिव्य प्रेरणाशिल्प उभे केले पाहिजे अशी सूचना मी या निमित्ताने करतो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारताना कोणत्याही प्रकारची घाई करु नये. आपणास लवकर स्मारक उभे करायचे आहे म्हणून घाईघाईने ते उभे करु नका अशी माझी विनंती आहे. हे स्मारक उभारण्यासाठी जगभरातील तज्ज्ञ, देशातील तसेच राज्यातील जे जे समतावादी विचाराचे आहेत, आंबेडकरवादी विचारांचे आहेत, ज्यांचे ज्यांचे संविधानावर प्रेम आहे अशा मान्यवरांकडून निव्वळ सूचना घेऊन एक अतिशय चांगल्या प्रकारचे शिल्प उभे करावे. ते शिल्प डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे नसेल, तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिल्प याचा अर्थ समतेचे शिल्प, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिल्प याचा अर्थ माणुसकीचे शिल्प, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिल्प याचा अर्थ स्त्री-पुरुष समतेचे शिल्प, आपण अशाप्रकारचे शिल्प उभे रहावे. तेव्हा स्टॅच्यू ऑफ इक्वॅलिटी, एक समानतेचे, समतेच्या सामाजिक न्यायाचे विराट व भव्य दिव्य शिल्प उभे करावे अशी सूचना करतो आणि पुन्हा एकदा या सभागृहाचे आणि आपले अभिनंदन करुन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आणि त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, दिनांक 5 डिसेंबर, 2012 रोजी भारताच्या दृष्टीने, महाराष्ट्राच्या दृष्टीने आणि मुंबईच्या दृष्टीने कोणती आनंदाची बातमी असेल तर ती म्हणजे या देशाचे महामानव परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी मुंबई शहरातील इंदू मिलची जागा देण्याची घोषणा केंद्रामध्ये करण्यात आली. देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग, केंद्रीय उद्योग मंत्री, काँग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी, केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेब, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या शिष्टाईमुळे ही जागा मिळाली हे कोणीही नाकारता कामा नये.

सभापती महोदय, या देशावर इंग्रजांनी 150 वर्षे राज्य केले. देशामध्ये जातीयवाद व धर्मवाद इतक्या मोठ्या प्रमाणावर होता की कोणाला मरणाची तहान लागली तरी प्रवासात पाणी मिळेल की नाही अशी परिस्थिती होती, असा इतिहास आहे. अशावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर फक्त दलितांचे होते असे माझ्यासारखी कार्यकर्ती मानायला तयार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सर्व देशाचे होते. मानवतावादी विचारांचे होते म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एकच राहिले, दुसरे कोणी जन्माला आले नाही, त्यांच्या एवढे उत्तुंग काम कोणी केले नाही. पुढे कोणी असे काम करील तो भाग निराळा असेल.

सभापती महोदय, केंद्रीय उद्योग मंत्री यांनी या प्रश्नामध्ये अत्यंत मोठेपणाने आणि समर्पक असे काम केलेले आहे त्याबद्दल त्यांचे देखील आभार मानने मला क्रमप्राप्त आहे.

सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या देशावर इंग्रजांनी 150 वर्षे राज्य केले. देशास स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपणास अनेक आंदोलने करावी लागली हे आपणा सर्वांना ज्ञात आहे. देशास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाला एकसंघ ठेवण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जी चौकट बांधली, देशातील सर्व जातीधर्माच्या लोकांना बरोबर घेऊन जाण्याची एक चौकट बांधली, या देशाची प्रगती कशा पध्दतीने व्हावी यासाठी चौकट बांधली, देशाचे संविधान कसे पोलादी राहील याचे त्यांनी जे दिग्दर्शन केले त्याला जगामध्ये तोड नाही, असे इतिहास सांगतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक त्या दर्जाचे झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार मला असे वाटते की, आपण नगर विकास विभागाच्या सर्व चर्चा येथे उपस्थित केल्या आणि बिल्डर लोकांसारख्या पैशाच्या येथे चर्चा झाल्या तर ते योग्य नाही. मी मुंबई महानगरपालिकेमध्ये 20 वर्षे नगरसेविका म्हणून काम केलेले आहे. आपण सर्वच गोष्टी पैशाने, एफएसआयने व फ्लोटिंग एफएसआयने केल्या तर या स्मारकाचा विकास व्हायला कुठेतरी अडथळे येतील आणि अशात-हेचे अडथळे कृपया करुन कोणी आणू नये, असे मला आपणास नम्रतापूर्वक सुचवावयाचे आहे.

यानंतर श्री.सरफरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

याचे कारण मी मघाशी म्हटल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची चौकट....

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 11.45 पर्यंत होती, सभागृहाची वेळ 10 मिनिटांनी म्हणजेच 11.55 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी फक्त दोन मिनिटांमध्ये माझे भाषण संपविणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशामध्ये कायदेमंत्री म्हणून जे काम केले आहे त्याला तोड नाही. म्हणून मला सांगितले पाहिजे की, या निर्णयाच्या बाबतीत अत्यंत मेहनतीने, अत्यंत बुध्दिकौशल्य वापरुन राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी काम केले आहे.इतकेच नव्हेतर कॉग्रेस पक्षाच्या 1904 सालच्या जाहीरनाम्यामध्ये देखील हे स्मारक व्हावे याकरिता मागणी करण्यात आली होती, त्यानंतर सन 2009 च्या कॉग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये देखील ही मागणी करण्यात आली होती. त्या मागणीला अनुसरुन शासनाने 5 डिसेंबर 2012 रोजी कायम स्वरुपी स्मारक करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याकरिता आपण सर्व सन्माननीय सदस्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना आनंदाने भेटून त्यांना हे स्मारक शासनाने लवकरात लवकर पूर्ण करावे या बाबत विनंती करावी जेणेकरुन जगाच्या नकाशावर ते कसे जाईल, जगातील अनेक पर्यटक या स्मारकाला भेट देतील व त्या ठिकाणी येऊन अभ्यास करतील, त्याचे दिग्दर्शन जगापुढे करतील असे् मी सुचवितो. सभापती महोदय, आपण माझ्यासारख्या एका महिला सदस्यास बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपविते, जय हिंद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, प्रस्तावावरील चर्चेमध्ये आम्हा महिला सदस्यांकरिता वेळेचे आरक्षण ठेवण्यात आले नसल्यामुळे मी फक्त पाच मिनिटे बोलणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक चैत्यभूमीच्या ठिकाणी असणे अत्यंत आवश्यक आहे. हे स्मारक पुढील पिढीसाठी दीपस्तंभासारखे काम करणार आहे. इतिहासाला सर्वच बऱ्या-वाईट गोष्टींची नोंद घ्यावी लागते. इतिहासामध्ये अनेक चांगल्या गोष्टींची नोंद होत असते. या देशातील तरुण युवक आणि युवतींना देशाचे भविष्य घडवावयाचे असेल तर त्यांना मार्गदर्शक ठरणारी अशी ही वास्तू उभी राहणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या एका महान नेत्याने या देशातील गोरगरीब, कष्टकरी जनतेसाठी जो त्याग केला आहे त्याची माहिती लोकांना मिळाली पाहिजे. आज जगामध्ये अतिशय जलद गतीने बदल होत आहे, या बदलत्या जगातील तरुण पिढीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य या स्मारकाव्दारे चांगल्या प्रकारे समजले पाहिजे अशाप्रकारचे स्मारक त्या ठिकाणी झाले पाहिजे.

सभापती महोदय, 6 डिसेंबर रोजी चैत्यभूमीवर राज्याच्या काना-कोपऱ्यातून अत्यंत गरिबातील गरीब महिला-पुरुष आपल्या डोक्यावर गाठोडे घेऊन आणि कडेवर मुलांना घेऊन प्रवासामध्ये धक्के खात येऊन पोहोचतात. त्यांच्या या गर्दीमध्ये वर्षानुवर्षे वाढ होत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण होऊन 56 वर्षे झाली. त्यामुळे राज्यातील सर्व लोकांच्या दृष्टीने ते महामानव होते अशा या महामानवाचे स्मारक चांगल्या प्रकारे झाले पाहिजे. इंदू मिलची जागा ताब्यात घेण्याबाबत अनेकजण श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण हे श्रेय घेण्यापेक्षा हे स्मारक जास्तीत जास्त चांगले कसे होईल यासाठी प्रयत्न करावेत. इंदू मिलची जागा ताब्यात मिळण्यामध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले होते, त्यामुळे हा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता, त्यामध्ये अनेक अडचणी येत होत्या त्या सर्व अडचणींवर मात करुन साडे बारा एकर जमीन या स्मारकासाठी मिळाली आहे. त्याकरिता श्री. विजय कांबळे यांनी अनेक वर्षापासून आंदोलन केले आहे.

मला एक गोष्ट आठवते की, 1999 साली मच्छीमार बांधवासह चैत्यभूमीवर आम्ही आंदोलन केले. वरळी सी-लिंकचे काम करण्यासाठी मोठया प्रमाणात भराव टाकण्यात येत होता त्यावेळी बांद्र्यापासून माहिमच्या समुद्रामध्ये 100 एकर जमिनीमध्ये भराव टाकला गेल्यामुळे दादर चौपाटी नष्ट झाली होती, चैत्यभूमीला मोठ-मोठे तडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

गेले होते. त्याबाबतचे वृत्त टाईम्स ऑफ इंडियामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर आम्ही चैत्यभूमीला भेट दिली. त्यानंतर श्री. श्याम गायकवाड आणि आम्ही सर्वांनी दलित वस्तीमध्ये, बुध्द विहारामध्ये बैठक घेऊन त्या ठिकाणी प्रचंड मोर्चा काढला. त्या मोर्च्यामध्ये मच्छीमार बांधव आणि दलित संघटनांनी भाग घेतला होता. अशाप्रकारे वातावरण निर्मिती केल्यानंतर शासनाचे त्या गोष्टीकडे लक्ष वेधले गेले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानंतर चैत्यभूमीचे सुशोभिकरण करण्यात आले आणि नेहमीप्रमाणे काही लोकांनी याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला होता. म्हणून मला असे वाटते की, याबाबतीत कोणी श्रेय घेण्यापेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जर आपण खऱ्या अर्थाने मानत असलो, त्यांच्या विचाराने काम करीत असलो तर आजही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर 56 वर्षामध्ये दलितांच्या किंवा झोपडपट्टयांमध्ये जे बहुसंख्य लोक रहात आहेत त्यांच्या परिस्थितीमध्ये बदल झालेला नाही. अजूनही तेथील लोकांना हलाखीच्या परिस्थितीमध्ये रहावे लागत आहे. केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारुन आपण या लोकांची परिस्थिती सुधारु शकणार नाही.पण जर तेथील लोकांची परिस्थिती बदलावयाची असेल आणि आज ज्या जलद गतीने विश्व पुढे जात आहे. अशा वेळी तरुण पिढीला,वर्षानुवर्षे खितपत पडलेल्या दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कसा न्याय मिळवून दिला, त्यांना समानतेची वागणूक कशी मिळाली याची सर्वांना माहिती व्हावी यासाठी त्यांचे स्मारक होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आपण जर ताजमहाल किंवा एखादी ऐतिहासिक वास्तू पहाण्यासाठी गेल्यावर आपल्याला त्याठिकाणी केलेल्या कार्याची सर्व माहिती मिळते. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जे कार्य केले आहे त्याचे पुढील पिढीला मार्गदर्शन व्हावे यासाठी एक चांगल्या प्रकारची वास्तू निर्माण करावी अशा प्रकारची सूचना करुन मी माझे भाषण संपविते.

. . . .क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

नियम 260 अन्वयेच्या सदर प्रस्तावावरील चर्चा उद्या सकाळी विशेष बैठकीमध्ये घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11 वाजून 51 मिनिटांनी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

राज्यातील बाल सुधारगृहातील गैरव्यवहार रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना

(१) * ३३३१९ श्री.विनोद तावडे , ॲड.आशिष शेलार , श्री.चंद्रकांत पाटील , श्रीमती शोभा फडणवीस, श्री.अनिल भोसले , श्री.हेमंत टकले , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.भगवान साळुंखे , डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ११०० च्यावर बाल सुधारगृहे असून त्यांच्या संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांची तपासणी केली असता ५० टक्के व त्याहून अधिक बाल सुधारगृहांमध्ये पटसंख्येवर नमूद केलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा कमी विद्यार्थी आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालगृहांतील गैरव्यवहार रोखण्यासाठी नियम करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विचाराधीन बाबींवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(४)तसेच बालसुधारगृहांना मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५)अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

प्रा.वर्षा गायकवाड : (१) नाही.

(२) नाही,

तथापि, बालगृहाच्या कामकाजामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या तपासणीमध्ये ज्या संस्थामध्ये आढळून आलेल्या तृटींच्या अनुषंगाने संबंधित १८६ संस्थावर मान्यता रद्दची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच

१. शासन निर्णय क्र. बालगृ-२०११/प्र.क्र.१५४/का-८ दिनांक २८ एप्रिल, २०११ अन्वये राज्यातील शासकीय, स्वयंसेवी अनुदानित व विनाअनुदानित बालगृह, निरीक्षण गृह आणि अनुरक्षण गृह यांची तपासणी करण्यासाठी आयुक्त स्तरांवरील अधिकारी तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. तसेच
२. शासन निर्णय क्र.बालग-२०११/प्र.क्र.२५०/का-८ दिनांक २२ डिसेंबर, २०११ अन्वये बाल न्याय अधिनियमाअंतर्गत बालगृह मान्यतेबाबत निकष निश्चित करण्यात आले आहे.
३. शासन निर्णय क्र.बालग-२०११/प्र.क्र.२५०/का-८ दिनांक २२ डिसेंबर, २०११ अन्वये संस्था व संस्थेतील बालकांची सर्वांगीण काळजी व संरक्षणाचा सर्वसमावेशक आराखडा (Comprehansive Care Plan) निश्चित करण्यात आलेला आहे.
४. शासन परिपत्रक क्र.बालगृ-२०१२/प्र.क्र.१२३/का-८ दिनांक २ मे, २०१२ अन्वये बालगृहाची मान्यता तसेच नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात पाळावयाचे शिष्टाचाराबाबत (Exit Plan / Crisis management Protocols) तयार करण्यात आलेला आहे.
५. The Protection of Children from Sexual Offence Act, २०१२ हा कायदा दिनांक २० जून, २०१२ पासून देशात लागू झाला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

ता. प्र. क्र. 33319 ....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील बालगृहे, महिला सुधारगृहे या विषयातील लक्तरे सातत्याने गेली काही महिने शासकीय अहवालातून, कोर्टाच्या माध्यमातून रोज येताना पाहात आहोत. ज्या संवेदनशीलतेने या सर्व बालगृह आणि महिला सुधारगृहाच्या विषयामध्ये काळजी घेतली पाहिजे तसे सरकारच्या बाजूने होताना दिसत नाही. त्यामुळे या सर्व गोष्टी बाहेर येत आहेत. आता या प्रश्नाच्या अनुषंगाने जो अहवाल आलेला आहे तो वाचल्यानंतर ही जी काही बालगृहे आहेत ती चुकीच्या पध्दतीने वाटली गेली हे शासनाला मान्य आहे का ? किती बालगृहांची तपासणी पूर्ण झालेली आहे ? या बालगृहांच्या बाबतीत विशेषत: मराठवाडा आणि बीड जिल्ह्याच्या संदर्भात जी चर्चा झाली त्याबाबत शासन वास्तव माहिती देणार का ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी पहिला प्रश्न असा विचारला की, चुकीच्या पध्दतीने बालगृहे दिलेली आहेत का ? या बाबतीत मी सांगू इच्छिते की, याबाबत प्रोसीजर करुन आयुक्तांच्या माध्यमातून त्यांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छिते की, आपण आतापर्यंत मागील वर्षात 70 आणि आता 116 अशा 168 बालगृहांची मान्यता रद्द केलेली आहे आणि ही आपली सतत चालणारी प्रक्रिया आहे. मधल्या काळामध्ये 99 पथके तयार करुन मराठवाडा रिजनमध्ये वारंवार भेटी देऊन बालगृहांची तपासणी करीत आहोत आणि ही प्रक्रिया सातत्याने सुरु राहील याची शासन काळजी घेत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या बालगृहांच्या प्रश्नावर वारंवार अनेक समस्या आणि अनेक आव्हानांना आपल्याला तोंड द्यावे लागते. एवढी मोठी बालगृहांची संख्या असताना महाराष्ट्रामध्ये प्रत्येक जिल्ह्यात किती बालगृहे गरजेची आहेत याबद्दल काही असेसमेंट किंवा अंदाज या संदर्भात स्टेटस रिपोर्ट तयार केला आहे का ? साधारणपणे आपण 10 वर्षाचा अंदाज काढला तर ज्यांना घराचा आधार नाही अशा मुलांची संख्या किती प्रमाणात वाढते हे लक्षात येते. या दृष्टीकोनातून या पुढच्या काळात जेवढी गरज आहे त्या बाबतीत काही पावले उचलली आहेत का जेणेकरुन असे गैरप्रकार परत होऊ नयेत. राज्यामध्ये बालहक्क आयोगाची निर्मिती झालेली आहे. बालहक्क आयोगाकडून या सर्व बालगृहांची निगराणी करण्याच्या बाबतीत काही पावले उचलली आहेत का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 33319 .....

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पहिला प्रश्न असा विचारला की, गैरप्रकार होऊ नये म्हणून काही मास्टर प्लॅन तयार करणार का ? मी सांगू इच्छिते की, आपण सातत्याने प्रयत्न करीत आहोत की, ज्या ठिकाणी जास्त बालगृहे दिलेली आहेत त्या ठिकाणी तपासणी करुन त्यांची क्वालिटी व्यवस्थित असावी या दृष्टीकोनातून प्रयत्न करीत आहोत. मधल्या काळामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांशी माझी या विषयावर चर्चा झाली. त्यावेळी एक निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाचा जिल्हा क्रायटेरिया होता. माननीय मुख्यमंत्र्याशी चर्चा केल्यानंतर तालुक्याला कमीतकमी एक द्यावे असा क्रायटेरिया ठरविला. आधी यशदाला हे काम दिले होते. आता टीआयएसएच या संस्थेबरोबर या संदर्भात पूर्ण चर्चा केलेली आहे आणि आयुक्त कार्यालयाला सुध्दा सांगितले आहे की, सिंगल पॅरेंट मुले किती आहेत, ज्यांना दोन्ही पॅरेंट्स नाहीत अशी मुले किती आहेत, ज्यांना दोन्ही पॅरेंट्स आहेत अशी मुले किती आहेत याचा पूर्ण डाटा त्यांनी जि.बा.बा.च्या माध्यमातून कलेक्ट करावा आणि त्याची एकत्रित माहिती घेऊन त्याचे प्रेझेंटेशन करावे. या संदर्भात आम्ही आधीच विभागाला सांगितले आहे

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात केंद्र शासनाने कायदा केला आणि आवश्यकता म्हणून राज्यात आला. यामध्ये प्रत्येक मुलामागे आपल्याला 950 रुपये मिळतात. अशा पध्दतीने या विषयांमध्ये ज्या बोगस संस्था नोंदविल्या गेल्या त्यांच्याबद्दल कारवाई केली असे म्हटले आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझा प्रश्न असा आहे की, यामध्ये दोषी असलेल्या इतर संस्थांवर आणि कर्मचा-यांवर फौजदारी आणि दिवाणी गुन्हे दाखल करण्यात येतील काय ? संस्थांना दिलेले पैसे व्याजासहीत वसूल करण्यात येतील काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : मी सांगितलेले आहे की, 186 संस्था बंद केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी वसुली संबंधी प्रश्न विचारलेला आहे. काही ठिकाणी प्रोसिजर फॉलो केलेले असून कारणे दाखवा नोटीसा दिलेल्या आहेत. काही संस्थांना मुलांच्या संख्येच्या प्रमाणात जास्त अनुदान दिले गेले असेल तर ते वसूल करण्यासंबंधी विभाग निश्चितच विचार करील.

श्री. किरण पावसकर : 186 संस्थांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. एकीकडे मान्यता रद्द झाली की तेच लोक दुसरीकडे दुस-या नावाने संस्था काढून त्यास मान्यता घेतात. या संस्थांना अधिकारीच मान्यता देत असतात. तेव्हा अशा प्रकारच्या ज्या बोगस संस्थांच्या शिफारशी केल्या जातात त्याबाबतीत अधिका-यांवर आणि संस्थाचालकांवर कोणती कारवाई केलेली आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : गैरव्यवहार करणा-यांना शासन झाले पाहिजे या मताची मी देखील आहे. जे काही गैरप्रकार झालेले असतील त्याबाबतीत जी काही कारवाई करावयाची आहे ती निश्चितच केली जाईल. मी सांगू इच्छिते की, ही कंटिन्युअस प्रोसेस आहे. ज्या संस्था दोषी आहेत त्यांची मान्यता रद्द करण्याचे काम आम्ही करीत आहोत. वेळ प्रसंगी फौजदारी कारवाई देखील आम्ही प्रस्तावित करतो. बाल सुधारगृहातील मुलांना चांगले प्रोत्साहन मिळावे यासाठी विभागाने अनेक उपक्रम राबविलेले आहेत. त्यांच्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन योजना सुरु केलेली आहे, चाचा नेहरु बालमहोत्सव योजना सुरु केलेली आहे. असे विविध उपक्रम विभागाने सुरु केलेले आहेत.

श्री. भाई गिरकर : 186 संस्थावर कारवाई केली त्याबद्दल शासनास धन्यवाद. या गैरप्रकारामध्ये ज्या ज्या संस्था आणि अधिकारी दोषी आढळलेले आहेत अशा अधिका-यांवर आणि संस्थाचालकांवर फौजदारी कारवाई केलेली आहे काय ? किती लोकांना अटक केलेली आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : ज्या ज्या संस्थांच्या तक्रारी प्राप्त झाल्या त्या संस्थांवर कारवाई केलेली आहे. तसेच ज्या 186 संस्थांचा उल्लेख होत आहे त्याबाबतीत जे काणी दोषी असतील त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33319...

श्रीमती दिप्ती चवधरी : ज्या बालहक्क आयोगाने या संस्था बंद करण्यास सांगितलेले आहे त्या बालहक्क आयोगाने या संस्थांना प्रत्यक्ष भेटी दिलेल्या आहेत काय ? ज्याचे स्वत:चे बालगृह आहे अशी व्यक्ती त्या भेटीच्या वेळी त्यांच्या सोबत होती का ?

प्रा. वर्षा गायकवाड : त्यांनी फक्त 8 संस्थांना भेटी दिल्या. त्या संस्थांचे अ, ब, क, ड मध्ये वर्गीकरण करण्याचे काम त्यांनी केले. त्यांनी हा रिपोर्ट दिलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,. या 186 संस्थांनी गैरव्यवहार केले असल्यामुळे त्यांची मान्यता शासनाने रद्द केलेली आहे. ज्याअर्थी संस्थांची मान्यता रद्द करण्यात आली आहे, त्याअर्थी त्यांनी गैरव्यवहार केलेले आहेत. या 186 संस्थांनी गैरव्यवहार केलेला असल्यामुळे त्या सर्व संस्था चालकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करणार आहात काय ? ज्या अधिकाऱ्यांनी या संस्थांना पाठीशी घातले, त्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई केली जाईल काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या संदर्भात मी सांगितले की, याबाबतची पूर्णत: चौकशी केली जाईल. यात जर अधिकारी दोषी आढळून आले तर त्यांचे विरुध्द कारवाई केली जाईल.

सभापती : लहान मुलांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्यांना माननीय मंत्री महोदयांनी आपल्या दालनात बोलवावे आणि त्यांची या विषयी जी परखड मते आहेत ती समजून घ्यावीत. याबाबतीत अत्यंत कठोर कारवाई कशी करता येईल या दृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालावे.

प्रा. वर्षा गायकवाड : ठीक आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील पोषण आहारासाठी दिलेला 50 पोती तांदूळ फत्तेपूर जवळ वर्धा नदीच्या पात्रात फेकून देण्यात आल्याबाबत

(2) * 34085 श्री.विनायकराव मेटे , श्री.सतीश चव्हाण , ॲड.जयदेव गायकवाड , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तिवसा (जि. अमरावती) तालुक्यातील फत्तेपूरजवळ वर्धा नदीच्या पात्रात पोषण आहारासाठी दिलेला 50 पोती तांदूळ दिनांक 11 सप्टेंबर, 2012 रोजी वा त्यासुमारास फेकून देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरूध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1), (2), (3) व (4) दिनांक 10.9.2012 रोजी शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ नदीपात्रात फेकून दिला असल्याबाबतची बातमी प्रसिध्द झाली होती. त्यानुसार चौकशी केली असता नदीपात्रात आढळून आलेल्या तांदुळाच्या पोत्यावर भारतीय अन्न महामंडळ, वखार महामंडळ आणि जिंदाल राईस मिल, हरियाणा वर्ष 2011-12, फुड अँड सप्लाय डिपार्टमेंट हरयाणा असे अंकित करण्यात आल्याचे दिसून आले आहे. सदर तांदूळ शालेय पोषण आहार योजनेचा नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, तिवसा, जि.अमरावती तालुक्यातील पोषण आहारासाठी दिलेला 50 पोती तांदूळ फत्तेपूर जवळ वर्धा नदीच्या पात्रात फेकून दिल्याबाबतचे हे प्रकरण आहे. जो तांदूळ मिळाला आहे, तो कोणता आहे, तांदुळाच्या गोण्यांवर महामंडळाचे शिक्के आहेत. या सर्व गोष्टी विभागाने मान्य केल्या आहेत. परंतु तांदूळ आमचा नाही असे सांगून विभागाने हात वर केले आहेत. जर हा तांदूळ तुमच्या विभागाचा नसेल तर तो कोणाचा आहे ? या प्रकरणी चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी समिती नेमली होती, त्या समितीचा अहवाल

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34085...

श्री.विनायक मेटे...

विभागास प्राप्त झाला आहे काय ? गटशिक्षण अधिकारी व सर्व शिक्षा अभियानातील अधिकारी व कर्मचारी समितीला सहकार्य करीत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. हा तांदूळ कोणाचा आहे, चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्या अनुषंगाने विभागाने काय कार्यवाही केली आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, अमरावती जिल्हयातील तिवसा तालुक्यातील फत्तेपूर जवळ वर्धा नदीच्या पात्रात तांदूळ फेकून दिल्याचे वृत्त "दैनिक लोकमत" या वृत्तपत्रात दिनांक 10.9.2012 या दिवशी प्रसिध्द झाले होते. शिक्षण अधिकारी आणि गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती तिवसा आणि जिल्हा मार्केर्टींग अधिकारी यांच्याकडे चौकशी करुन माहिती मागविली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडून माहिती मागविण्यात आली आहे. तसेच या बाबतीत पोलीस पंचनामा करण्यात आलेला आहे. सदरहू सर्व माहितीच्या आधारे निष्कर्ष असा काढू शकतो की, त्या ठिकाणी 50 पोते तांदूळ फेकला नसून 2 ते 3 पोते तांदूळ नदी पात्रात फेकल्याचे आढळून आले आहेत. जी तांदुळाची पोती सापडली आहेत ती शालेय शिक्षण विभागाचे नाहीत. याची सुध्दा शिक्षण अधिकाऱ्यांनी शहानिशा केलेली आहे. शालेय पोषण आहारासाठी अशा प्रकारचे लेबल्स लावून अन्नधान्य सप्लाय केले जात नाही. शालेय शिक्षण विभागाने तेथील सर्व गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या माध्यमातून माहिती मागविली आहे. त्या ठिकाणचे साठा रजिस्टर, प्रत्यक्षात पुरविण्यात आलेला साठा, शिल्लक असेलेला साठा व शिजवण्यासाठी वापरण्यात आलेला तांदूळ इत्यादी सर्व माहिती मागविण्यात आलेली आहे. सदरहू माहिती पाहता यामध्ये कमतरता आढळून आलेली नाही. या ठिकाणचा तांदूळ शालेय पोषण आहाराचा नाही. जिल्हाधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली त्यांनी देखील मत मांडले आहे की, कोणी तरी खाजगी माणसाने सडलेला तांदूळ फेकून दिलेला असावा.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रायव्हेट पध्दतीचा तांदूळ असावा. दोन ते तीन पोती तांदूळ असल्याची पंचनाम्यामध्ये नोंद झालेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा तांदूळ शालेय पोषण आहाराचा आहे की कोणत्या योजनेचा आहे? तिवसा नदीच्या पात्रात तांदूळ फेकून देण्याची मजल गेली आहे, याची दखल घेतली पाहिजे. हरियाणा येथील जिंदाल राईस मिलमधून हा तांदूळ या राज्यात आला होता. वखार महामंडळाच्या नावाची नोंद पोत्यावर असल्याचे उत्तर म्हटले आहे. विषारी तांदूळ नदीच्या पात्रात टाकून नदीच्या पाण्यात विष मिसळविण्याचा प्रयत्न कोणाकडून केला गेला आहे का? या प्रकरणाची योग्य चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली जाईल काय?

प्रा.फौजिया खान : जिल्हाधिकाऱ्यांची या प्रकरणाची चौकशी करुन माहिती घेतली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार हा तांदूळ खाजगीरित्या कोणीतरी फेकून दिला असावा असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळांच्या मूल्यांकनाचे निकष बदलून अनुदान देण्याबाबत

(३) * ३४९३४ डॉ.सुधीर तांबे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , श्री.विनायक राऊत , श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले , श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.नागो पुंडलिक गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ३००१४ ला दिनांक १० जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक, माध्यमिक शाळांचे मूल्यांकनाचे निकष अंत्यत कठीण व कठोर असल्यामुळे सदर निकषांमध्ये बदल / सुधारणा करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी मा.शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ ऑगस्ट, २०१२ रोजी प्रतिनिधी व इतरांसोबत बैठक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सुधारित मूल्यांकनाचे निकषाबाबतचा जुन्या व नव्या शाळा असा भेदभाव न करता शासन निर्णय निर्गमित करुन निकष प्राप्त शाळांना सन २०१२ पासून अनुदान देण्याबाबत निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, उपरोक्त बाबतीत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१) मुल्यांकनाचे निकष सुधारित करण्याच्या संदर्भात दिनांक ७ ऑगस्ट,२०१२ रोजी मा.मंत्री, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक व पदवीधर आमदार यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) व (३) मूल्यांकनाबाबतचे निकष सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्याच्या शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. राज्यामध्ये जवळजवळ ४००० कायम विनाअनुदानित शाळा आहेत. २००९ मध्ये कायम हा शब्द वगळण्यात आला. त्यानंतर पूर्वीच्या मूल्यांकनाच्या निकषामध्ये बदल करण्यासाठी शासनाने एक समिती नेमली होती. निकष निश्चित करण्यामध्ये जवळजवळ दोन वर्षाचा काळ उलटून गेला. निकष इतके कठोर आहेत की, ४००० पैकी केवळ ५२ शाळा अनुदानासाठी पात्र ठरल्या आहेत. हे निकष शिथील करावेत म्हणून आम्ही सातत्याने सभागृहात मागणी केली आहे. मंत्री महोदयांनी संबंधितांबरोबर बैठक घेऊनही काही तोडगा निघालेला नाही. या शाळांना अनुदान मिळण्यासाठी निकष निश्चित केले की, त्यांना अनुदानापासून वंचित ठेवण्यासाठी केले आहेत? हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन या संदर्भात ठोस निर्णय घेणार आहे काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने २००९ मध्ये कायम विनाअनुदान तत्व बंद करुन सर्व मराठी शाळांना अनुदान तत्वावर मान्यता दिली जाईल अशा प्रकारचे धोरण स्वीकारले. त्यामुळे पूर्वीचे जूने निकष बदलून सचिव समितीकडून मूल्यांकनाचे सुधारित निकष निश्चित .....

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आले. या निकषांना मंत्रीमंडळाची मान्यता घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. मूल्यांकनाचे सुधारित निकष अनुदानासाठी निश्चित केले गेले. शैक्षणिक गुणवत्तेकडे लक्ष देण्यासाठी निकषामध्ये बदल केला गेला. शैक्षणिक गुणवत्तेसाठी ५० गुण ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी ३७ गुण मिळणे अनिवार्य करण्यात आले आहे. म्हणजे ७५ टक्के गुण शैक्षणिक गुणवत्तेवर असावेत हे निकष पहिल्यांदा लागू केले. हे निकष कठोर आहेत म्हणून लोकप्रतिनिधींकडून अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34934....

प्रा.फौजिया खान .....

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात लोक प्रतिनिधींबरोबर बैठक घेण्यात आली होती. या प्रश्नाच्या संदर्भात लोक प्रतिनिधींनी यातील निकष बदलावेत तसेच यामध्ये काही शिथीलता आणावी यासंदर्भात सूचना केल्या होत्या. या विषयाबाबत शासनाने एक अंतर्गत समिती देखील स्थापन केली होती व त्या समितीकडून सुद्धा यासंदर्भात सूचना मागविण्यात आलेल्या आहेत. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर दोनदा बैठका झालेल्या आहेत. कोणते निकष बदलवता येतात यासंदर्भात या बैठकीमध्ये सखोल चर्चा झाली होती. जे कठोर निकष होते ते शिथील करण्याचा शासनाचा विचार असून त्यासंदर्भात शासन योग्य ते पाऊल उचलत आहे एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मागच्या आठवडयात माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत संस्था चालक संघटनेची बैठक झाली होती व त्या बैठकीमध्ये अनेक लोक प्रतिनिधी उपस्थित होते. कठोर निकषाचे फेर विचार करण्याचे स्पष्ट आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या बैठकीत दिलेले असून हा फेर विचार डिसेंबर संपण्याच्या पूर्वी घेतले जाणार आहेत असे त्यांनी आश्वासन दिले होते. कठोर निकषाच्या संदर्भात शासनाचे जे परिपत्रक आहे ते स्थगित ठेवावे व नवीन निकष निश्चित केल्यानंतर त्याची फेर तपासणी करावी व तोपर्यंत हे निकष स्थगित केले जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या निकषांमध्ये काही शाळा पात्र झालेल्या असून बाकीच्या शाळांना सुध्दा आपण यामध्ये संधी देत आहोत. शाळांनी कम्पलायन्स केले तर शाळांना संधी द्यावी याबाबतीत शासनाचा विचार सुरु आहे. ज्या शाळा पात्र झालेल्या आहेत त्यांना डिक्लेअर करण्यात आलेले आहे. प्राथमिक पात्र शाळांची संख्या 214 व माध्यमिक पात्र शाळांची संख्या 57 आहे. मूल्यांकनाचे निकष निश्चितच बदलण्यात येणार असून सुधारित निकषाच्या बाबतीत लवकरात लवकर आदेश देण्यात येणार आहेत.

सभापती : हा प्रश्न विद्यार्थ्यांच्या दृष्टीने, पालकांच्या दृष्टीने तसेच विना अनुदानित संस्थांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. हा प्रश्न समजून घेण्याचा मी देखील प्रयत्न केलेला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34934....

सभापती .....

मला असे वाटते की, शिक्षण क्षेत्राशी संबंधित असणारे तसेच या सभागृहातील जे ज्येष्ठ नेते आहेत त्यांच्या बरोबर या प्रश्नाच्या संदर्भात मी एक बैठक आयोजित करणार आहे. मी शालेय शिक्षण मंत्री तसेच राज्य मंत्र्यांना माझ्या दालनात या विषयाच्या संदर्भात बोलावणार आहे. त्यामुळे हा प्रश्न तहकूब न करता त्या बैठकीमध्ये जो काही निष्कर्ष निघेल तो निष्कर्ष सभागृहासमोर मांडण्यात यावा.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिलेला आहे तो आम्हाला मान्य आहे. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात जे उत्तर द्यावयास पाहिजे होते ते उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मी एकच सांगू इच्छितो की, मूल्यांकनाचे निकष सुधारित का करण्यात आले ?

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34934...

श्री.राजेंद्र दर्डा...

मूल्यांकनाचे निकष सुधारित करण्यामागे एकच उद्देश आहे. हे सर्व करीत असताना आम्ही शिक्षण संस्था पाहिलेली नाही, शिक्षक पाहिलेले नाहीत. परंतु, विद्यार्थ्यांचे हित आम्ही निश्चितपणे डोळ्या समोर ठेवले आहे. त्यामुळे पहिल्यांदाच आपण शाळेतील शैक्षणिक गुणवत्तेला गुण दिलेले आहेत. हे सर्व झाल्यानंतर कायम शब्द वगळलेल्या शाळांची एकूण संख्या किती होती हे देखील सांगतो. माध्यमिक शाळांची संख्या 2085 होती, तर प्राथमिक शाळांची संख्या 1399 होती. आम्ही त्यांना सांगितले होते की, मॅन्युअल अर्ज न भरता ऑनलाईनद्वारे अर्ज भरावा. 2085 पैकी फक्त 1372 शाळांनी अर्ज भरले आहेत. याचे कारण असे की, त्यांच्या लक्षात आले की, आपल्याला तीन वर्षांचा कालावधी आहे.

अनुदानासाठी अनुक्रमे 152 आणि 271 शाळा पात्र झाल्या आहेत. सभापती महोदय, यासंबंधी माझी आपल्याशी देखील चर्चा झालेली आहे. याच्याशी जेवढे म्हणून संबंधित सन्माननीय सदस्य आहेत त्यांच्याशी व विविध संस्थांशी देखील माझी चर्चा झाली आहे. यातील एक किंवा दोन निकष असे आहेत की, त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यां सोबत 3 बैठका झाल्या. कालच्या बैठकीत आमचा निर्णय हा जवळपास ठरलेला आहे. अजूनही आम्हाला फक्त एकच बैठक घ्यायची आहे. तेव्हा हे अधिवेशन संपण्याच्या आतच आम्ही स्वत: निकषामध्ये जो बदल करावयाचा आहे तो निश्चितपणे जाहीर करू. एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती : सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी आता सभागृहात सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे त्यामुळे माझ्या दालनात बैठक घेण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. माझी आणि माननीय शिक्षण मंत्र्यांची याबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये कोणत्याही सन्माननीय सभासदाला हरकतीच्या मुद्याचा आधार घेता येत नाही. शेवटी मी आपल्याला आपले म्हणणे मांडण्यास नंतर जरूर संधी देईन.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विना अनुदानित व अंशत: अनुदानित शाळेमध्ये शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत

(4) * 33378 श्री.वसंतराव खोटरे , डॉ.सुधीर तांबे , श्री.विक्रम काळे , श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विना अनुदानित व अंशत: अनुदानित शाळेमध्ये दिनांक 31 ऑक्टोबर, 2005 रोजी व तत्पूर्वी सेवेत रुजू झालेल्या काही शिक्षक/कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी वर्गणीदार खाते क्रमांक देण्यात आले आहेत. परंतु काही शिक्षक/कर्मचारी यांना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, खाते क्रमांक दिला गेला नसलेल्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक देण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त बाबतीत शासन निर्णय काढला आहे काय,

(4) नसल्यास, उपरोक्त बाबतीत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) हे खरे आहे.

(2) नाही.

(3) नाही.

(4) बाब न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. फार कमी शिक्षक जुनी पेन्शन योजने पासून वंचित राहिले आहेत. 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी वेतनश्रेणीत मान्यता असलेल्या विना अनुदानित किंवा अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षकांना 1 नोव्हेंबर 2005 नंतर 100 टक्के अनुदान मिळाले असले तरी जुनीच पेन्शन योजना लागू करण्यासंबंधी मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिला आहे, हे खरे आहे काय ? असा प्रश्न मागच्या वेळी विचारला असता त्यावर माननीय राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने विभागाने सकारात्मक प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला आहे. तेव्हा या प्रस्तावावर कोणता निर्णय झाला आहे, असा माझा पहिला प्रश्न आहे.

दुसरे असे आहे की, या कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी कपात करण्यात येत आहे. तर काही ठिकाणी कपात सुरू असताना ती बंद करण्यास सांगितले आहे. आमचा मुद्दा असा आहे की, ही कपात सुरूच ठेवावी. याबाबत ताबडतोब सुधारणा करून त्यांना सुद्धा जुनीच पेन्शन योजना लागू करण्यासंबंधी निर्णय घ्यावा अशी माझी नम्र विनंती आहे. यावर देखील माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, आम्ही सकारात्मक आहोत. शिक्षक सेवकांना जुनी पेन्शन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33378....

श्री.वसंतराव खोटरे...

योजना लागू केली, तसेच 1 नोव्हेंबर 2005 पूर्वीचे अंशत: अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक असतील त्यांना देखील धोरणात्मक निर्णय लागू करू असे आपण स्पष्ट उत्तर दिलेले आहे. तेव्हा यासंबंधीचा निर्णय आपण कधी घेणार आहात व त्यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33378...

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, वित्त विभागाने दिनांक 31 ऑक्टोबर, 2005 रोजी एक परिपत्रक काढून दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्यानंतर निवृत्त होणाऱ्या राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केलेली आहे. दिनांक 29 नोव्हेंबर रोजी शालेय शिक्षण विभागाने तो जी.आर.स्वीकारलेला आहे. 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी जे शिक्षक 100 टक्के अनुदानित शाळांमध्ये नोकरीस लागले असतील त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करता येते. दिनांक 19 जुलै 2011 मध्ये शिक्षण सेवकांना एक सवलत देण्यात आली. 100 टक्के अनुदानित शाळांमध्ये जे शिक्षण सेवक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी रुजू झाले असतील आणि सन 2005 नंतर सेवेत नियमित झाले असतील त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात येईल. सन्माननीय सदस्य जी वारंवार मागण करीत आहेत त्यामध्ये काही निश्चितपणे अटी आहेत. पहिली अट म्हणजे शाळा 100 टक्के अनुदानित असेल तरच पेन्शन योजना लागू करता येईल. (अडथळा). सन्माननीय सदस्य माझ्या उत्तरामध्ये अडथळा आणत असल्यामुळे मला व्यवस्थित उत्तर देता येत नाही. माझी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर त्यांनी मला प्रश्न विचारावेत.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, आम्ही दोघी महिला मंत्री आहोत. आमचे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारुन विषयाला जरुर न्याय दिला पाहिजे. परंतु आमचे उत्तर पूर्ण होण्या अगोदरच सन्माननीय सदस्य प्रश्न विचारुन उत्तरामध्ये अडथळा आणतात. तेव्हा आपण महिला मंत्री महोदयांना संरक्षण द्यावे, अशी मी विनंती करते.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगितल्यानंतर ते शांत बसले आहेत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी उत्तर देताना सन्माननीय सदस्यांनी अडथळे आणणे हे योग्य नाही. सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत याची मला कल्पना आहे. परंतु मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये अडथळे आणल्यास आपणास उत्तरे कशी मिळतील ?

सभापती महोदय, मी ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एक निर्णयाचा उल्लेख करते. युनानी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना सांगितले की, "एखाद्या संस्थेतील कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन लागू करण्याची बाब

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33378...

प्रा.फौजिया खान.....

ही राज्य शासनाच्या अखत्यारितील आहे आणि त्याबाबत न्यायालय आदेश देऊ शकणार नाही. सन्माननीय सदस्यांकडून होत असलेली मागणी मान्य करण्यात आली तर राज्य शासनावर मोठ्या प्रमाणात आर्थिक भार पडेल. तेव्हा ही मागणी मान्य करण्यासारखी नाही आणि तसे प्रतिज्ञापत्र राज्य सरकारने उच्च न्यायालयात सादर केलेले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी तक्रार केली की, माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घेतले जात नाही. त्यांना उत्तर देण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि काय उत्तर द्यायचे हा देखील त्यांचा अधिकार आहे. परंतु आपणास सभागृहात विसंगत उत्तर देता येणार नाही. कारण हा प्रश्न आता सभागृहाची प्रॉपर्टी झालेला आहे. तसेच माननीय मंत्री महोदयांना सभागृहाची दिशाभूल करणारी उत्तरे देता येणार नाहीत. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सभागृहाची दोनवेळा दिशाभूल केलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सन 2005 पूर्वी जे शिक्षक नियमित झालेले आहेत त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आलेली आहे. तेव्हा शिक्षण सेवक नंतर नियमित होऊन सुध्दा आपण त्यांना ती सवलत लागू केली. परंतु त्याचवेळी विनाअनुदानित किंवा अशंत: अनुदानित शाळांतील नियमित शिक्षकांना ती लागू केलेली नाही. ते शिक्षक नंतर नियमित झालेले नाहीत. तेव्हा राज्य शासनाला समान कर्मचाऱ्यांमध्ये भेद करता येणार नाही आणि तसा कायदा आहे. तेव्हा या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. माननीय मंत्री महोदयांना असा फरक करता येणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी सर्वोच्च न्यायालयाचा जो दाखला दिला तो वेगळ्या स्वरुपातील आहे. आपण लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, बाब न्याय प्रविष्ठ आहे. एक बाब न्याय प्रविष्ठ असताना सर्वोच्च न्यायालयाचा निकाल देऊन आपणास येथे निकाल देता येणार नाही. ते काम न्यायालयाचे आहे. ती जबाबदारी माननीय मंत्री महोदयांनी स्वत:कडे घेऊ नये. ही अत्यंत विसंगत आणि आक्षेपार्ह अशी बाब आहे.

यानंतर श्री.सरफरे..

अशोधित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्. 33378....

श्री. कपिल पाटील....

आपल्या उत्तरामधील दोन गोष्टी आक्षेपार्ह असल्यामुळे आपण त्या मागे घेतल्या पाहिजेत. एका बाजूला न्यायालयाचा अवमान होत असून सभागृहाची दिशाभूल सुध्दा होत आहे. आपण विसंगतीपूर्ण दिलेले उत्तर मागे घेतले पाहिजे. सर्वात महत्वाचा मुद्दा असा की, शिक्षण सेवकांना आपण जो न्याय लावला आहे, ते शिक्षण सेवक नियमित सेवेत नव्हते तर प्रोबेशन पिरियडमध्ये होते तरीसुध्दा त्यांची मूळ नेमणूक गृहीत धरली. विना अनुदानित शाळेतील शिक्षक नियमित होते त्यांना आपण मान्यता दिली अशा ॲप्रुव्हड शिक्षकांना नोकरीमध्ये समान न्याय नाकारता येत नाही, त्यांचा अधिकार काढून घेता येत नाही. याकरिता आपण ताबडतोब 2005 च्या संदर्भातील निर्णय या सर्व शिक्षकांना लागू करणे शासनाची जबाबदारी आहे ती आपण पार पाडणार काय? मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने 2005 पूर्वीचे शिक्षक अनुदानावर नसले तरी ते नियमित होते त्यांच्या बाबतीत निकाल दिला आहे, अशा तीन गोष्टी आपण नजरअंदाज करीत आहात ते बरोबर नाही. एवढाच मला आक्षेप नोंदवावयाचा आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी कोणतेही उत्तर विसंगतीपूर्ण दिलेले नाही. त्याबाबत शासनाने जो निर्णय घेतला तो मी स्पष्टपणे सांगितला आहे. त्यामध्ये हा निर्णय आपल्याला मान्य करता येणार नाही असे त्यासंबंधीचे प्रतिज्ञापत्र न्यायालयाला सादर करण्यात आले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी मान्य करता येणार नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, उत्तर देण्याचा अधिकार मंत्रीमहोदयांना आहे, परंतु चुकीचे व दिशाभूल करणारे उत्तर दिले जात आहे...

सभापती : आपण विचारलेल्या प्रश्नाला शासनाचे जे धोरण आहे त्यासंबंधीचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले आहे. ते उत्तर आपणास अपेक्षित नसले तरी ते शासनाचे धोरण असल्यामुळे मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. त्यामुळे त्या उत्तराव्यतिरिक्त अन्य उत्तर द्यावे असे मला मंत्री महोदयांना सांगता येणार नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी विसंगत उत्तर दिले आहे याला माझा आक्षेप आहे. बाकीचे काहीही उत्तर त्यांनी दिले तरी त्याबाबत आम्हाला लढावयाचे असेल तर आम्ही लढू. परंतु त्यांना विसंगत उत्तर देता येणार नाही, त्यांनी आपले उत्तर मागे घ्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामध्ये ही बाब न्यायप्रविष्ठ असल्याचे म्हटले आहे. मंत्री महोदयांनी उत्तर देतांना म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शिक्षणाच्या संदर्भातील बाब राज्य शासनाच्या अखत्यारीतील आहे. त्याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करणे आवश्यक आहे. जेणेकरुन माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या प्रश्नाला दुजोरा मिळेल. महाराष्ट्रातील हजारो शिक्षक कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. त्यामुळे ज्यावेळी ही बाब न्यायप्रविष्ठ आहे असे सांगितले जाते त्यावेळी शासनाने महाराष्ट्रातील कोणत्या शाळेतील, कोणत्या शिक्षकांनी कोणत्या मुद्यांबाबत ही बाब न्यायालयामध्ये नेली आहे हे सांगावे. राज्य शासनाच्या अखत्यारीतील ही बाब आहे असे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे असेल तर याबाबत राज्यशासन पुढील कोणता निर्णय घेण्याची कार्यवाही करणार आहे आहे?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने प्रतिज्ञापत्र सादर केले असे मी म्हटले आहे. दुसरी गोष्ट अशी की, माननीय सदस्यांच्या अपेक्षेनुसार मला सभागृहामध्ये कोणतेही आश्वासन देता येणार नाही. जे शिक्षक नियमित झाले आहेत त्यांचे पी.एफ. चे अकाऊंट उघडण्यात येईल. जे शिक्षक नियमित होऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी नवीन पेन्शन योजना लागू केली आहे. त्यामध्ये देखील कुणालाही वंचित ठेवण्यात येणार नाही. नवीन पेन्शन योजनेनुसार त्यांना देखील ही सवलत लागू असल्यामुळे त्यांचे अकाऊंट उघडण्यात येतील. त्यांच्याकरिता ही प्रक्रिया चालू राहील. ज्यांचे अकाऊंट उघडण्यात आलेले नाहीत त्यांच्यासाठी प्रक्रिया चालू करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने या ठिकाणी 1 नोव्हेंबर 2005 पूर्वीच्या नेमणुकांची डेडलाईन ठरलेली आहे. त्यामुळे ज्या शिक्षकांच्या नेमणुका 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी झाल्या आहेत व त्या 100 टक्के अनुदानावर आल्या आहेत अशा हजारो शिक्षकांच्या बाबतीत न्यायालयाने निर्णय दिला आहे व त्यांना पेन्शन योजना लागू केली आहे, त्यांचे अकाऊंट सुरु झाले आहेत. अशा किती शिक्षकांच्या बाबतीत न्यायालयाने निर्णय दिला आहे, ज्यांचे जुन्या पेन्शन योजनेनुसार अकाऊंट सुरु केले आहेत अशा शिक्षकांची संख्या किती?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33378 . . . .

श्री.रामनाथ मोते . . . .

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जे अन्य शिक्षक आहेत त्यांना न्यायालयाच्या निर्णयानुसार या लाभापासून वंचित ठेवता येणार नाही. त्यामुळे त्यांना सुध्दा आपण ही पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात आपण कार्यवाही करणार आहात काय

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, न्यायालयाने वैयक्तिक शिक्षकांच्या बाबतीत काही निर्णय दिला असेल तर त्या अनुषंगाने त्यांची जी संख्या आहे त्याची माहिती आम्ही सदनाच्या पटलावर ठेऊ शकतो. पण न्यायालयाने वैयक्तिक स्वरुपामध्ये निर्णय दिल्यामुळे ही बाब धोरणात्मक स्वरुपाची होत नाही. त्यामुळे याबाबतीत मी पूर्वी जे उत्तर दिलेले आहे तेच उत्तर राहील.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, सदरहू शाळांना 2004 पूर्वी अनुदान देण्यात आले आणि शिक्षण विभागाने संबंधितांना बँकेमध्ये खाते उघडण्यास सांगितले. त्यानुसार त्यांना ही योजना लागू होण्याचे संकेत होते. मात्र या योजनेतून त्यांना डावलण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने 2000 पूर्वीच्या शाळा या 100 टक्के अनुदानावर नाहीत म्हणजे त्या अंशत: शाळा आहेत. याबाबतीत बहुतेक सन्माननीय सदस्याचा प्रश्न हाच आहे की, ज्या अंशत: अनुदानित शाळा आहेत त्यातील जे शिक्षक आहेत, जे यासाठी पात्र आहेत त्यांना सदरहू योजना लागू करावी अशी सन्माननीय सदस्य विनंती करीत आहेत. याबाबत माननीय मंत्री महोदया आपण काही निर्णय घेणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, जी प्रकरणे न्यायप्रविष्ठ असतील त्याबाबत या ठिकाणी बोलता येणार नाही.

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : त्याचा काय संबंध आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मला याबाबतीत असे उत्तर द्यावयाचे आहे की, काही पी.एफ.अकाऊंटस् उघडण्यात आले होते. पण ते चुकून झालेले आहे. पण त्यानंतर 2011 मध्ये याबाबत खुलासा करण्यात आले आहे आणि जी अकाऊंटस् चुकून सुरु करण्यात आली होती ती बंद करण्यात येतील.

. . . .झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातिल शिक्षक व शिक्षकेत्तरांची रिक्त पदे भरण्यास बंदी घातल्याबाबत

(5) *34903 श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो पुंडलिक गाणार : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 2 मे, 2012 रोजी च्या शासन निर्णयानुसार अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यासाठी राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तरांची रिक्त पदे भरण्यास बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(2) राज्यात सप्टेंबर, 2012 अखेर शिक्षक शिक्षकेत्तरांची संवर्गानिहाय स्थानिक स्वराज्य संस्था व अनुदानित संस्थांमधील किती पदे रिक्त आहेत,

(3) पटपडताळणीच्या अनुषंगाने आतापर्यंत किती शाळा बंद करण्यात आल्या आहेत व अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक शिक्षकेत्तरांची संख्या किती आहे,

(4) सध्या सुरु असलेल्या शाळा शैक्षणिक वर्षाअखेर पर्यंत नियमानुसार बंद करता येणार नाही, हे खरे आहे काय,

(5) असल्यास,उपरोक्त भरतीवरील बंदी 1 वर्षे अगोदर लागू करण्याची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1), (2), (3), (4) आणि (5) राज्यात राबविण्यात आलेल्या विशेष पटपडताळणीच्या अनुषंगाने अतिरिक्त ठरणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 100 टक्के समायोजन करण्याच्या दृष्टीने पदे भरण्यास बंदी घातली आहे, तसेच मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार विशेष पटपडताळणी अभिलेखाचे जिल्हा स्तरावर पुनर्छाननी करून नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीकोनातून दोषी शाळा/संस्था यांना कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे. संबंधितांकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली (DISE) च्या अनुषंगाने राज्यात शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर प्रमाण पुरेसे आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील विशेषत: माध्यमिक शाळांच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीवरील बंदीच्या संदर्भात प्रश्न आहे. याबाबत या सदनामध्ये चर्चा झाली, पटपडताळणी झाली असून काही शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत आणि आम्हालाही ती गोष्ट मान्य आहे. याबाबत कार्यवाही सुरु आहे. पण अद्यापही या सर्व शाळा सुरु आहेत. मे 2013 अखेरपर्यंत एकही शाळा बंद होणार नाही. ज्या शाळा बंद होणार आहेत त्यांच्या बाबत आपण हे ॲन्टीसिपेट केले. अशा वेळी तेथील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरणार आहेत. अशा वेळी त्यांना समायोजित करण्यासाठी दिनांक 2 मे 2012 रोजी शासन निर्णय झाला आणि या राज्यातील सर्व शाळांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीवर शासनाने बंदी घातली. त्यामुळे आता हजारो शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.काही शाळांमध्ये 4 किंवा 6 शिक्षक नाहीत.म्हणून माझी विनंती आहे की,पटपडताळणीच्या अनुषंगाने बंद पडणाऱ्या ज्या शाळा आहेत,त्या जेव्हा खरोखर बंद होतील तेव्हा समायोजनेचा प्रश्न निर्माण होईल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होईल. सध्या आपल्यासमोर तो प्रश्न नाही. म्हणून राज्य शासनाने 2 मे 2012 च्या शासन निर्णयानुसार जी बंदी घातली आहे ती उठविण्याच्या बाबतीत ताबडतोब निर्णय घेईल काय आणि शिक्षकांच्या अभावी विद्यार्थ्यांचे जे नुकसान होणार आहे ते आपण टाळणार आहात काय? हा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, याठिकाणी आपण विद्यार्थी आणि शिक्षकांचे गुणोत्तर दिले आहे. पण ते फक्त प्राथमिक शाळांसाठी आहे. मात्र माध्यमिक शाळांसाठी विद्यार्थी आणि शिक्षक हे गुणोत्तर धरण्यात येत नाही. आर.टी.आय.अंतर्गत धरीत आहात हे मला मान्य आहे. परंतु माध्यमिक शाळांमध्ये तसे धरण्यात येत नाही. त्यामुळे तेथील पदे रिक्तच रहाणार आहेत. अशा वेळी सदरहू पदे भरण्यासाठी परवानगी देणे आवश्यक आहे. अशा वेळी शासनाने तातडीने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करुन हा निर्णय घेणार आहात काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे जी वस्तुस्थिती सांगितली ती खरी आहे आणि आपल्याला राज्यामध्ये ताबडतोब शिक्षकांची भरती करणे गरजेचे आहे हे आम्हाला सुध्दा मान्य आहे.पण दिनांक 2 मे 2012 च्या जी.आर.प्रमाणे राज्यामध्ये पटपडताळणी झाली आणि त्यामध्ये अतिरिक्त शिक्षक आढळून आले आहेत. मंत्रिमंडळाने कॉन्शस् निर्णय घेतला आहे की, जे अतिरिक्त शिक्षक आढळून आले त्यांचे समायोजन झाल्याशिवाय नवीन भरती करता येणार नाही.

सभापती महोदय, दिनांक 4 डिसेंबर 2012 मध्ये याबाबतीत समायोजन करावे याबाबत सर्क्युलर निर्गमित केलेले आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

त्याबाबत आदेश देण्यात आलेला आहे. कॅटेगरीनिहाय, विषयनिहाय सिनियॉरिटी लिस्ट तयार करावी आणि तत्काळ समायोजनाची प्रक्रिया करावी हे सुध्दा आदेशित करण्यात आले आहे. तरी सुध्दा माध्यमिक शाळांमध्ये रिक्त पदांची भरती करण्यासाठी खूप तातडीने कार्यवाही करण्याची गरज आहे. काल माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर जी बैठक झाली त्यामध्ये सुध्दा या संदर्भात चर्चा झालेली आहे आणि युध्द पातळीवर एक महिन्याच्या आत विभागाकडून पूर्ण समायोजनाच्या बाबतीत माहिती मिळणार आहे असे आश्वासन मी या ठिकाणी देत आहे. समायोजनाची जी प्रक्रिया आहे ती पूर्ण केल्याशिवाय नवीन भरती करता येणार नाही. पण जर आवश्यकता वाटली तर पुन्हा कॅबिनेटकडे जाऊन पुन्हा स्पेशल मान्यता घेणे, माध्यमिक शिक्षकांच्या भरतीच्या बाबतीत आपल्याला कसा मार्ग काढता येईल याबाबत सुध्दा कालच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. या बाबतीत शासन गंभीर आहे. लवकरात लवकर या रिक्त जागा भरण्याच्या बाबतीत शासनाने युध्द पातळीवर कार्यवाही करण्याचे ठरविले आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या राज्यामध्ये शिक्षण खात्याला प्रथमच दोन्ही पूर्णवेळ मंत्री महोदय मिळालेले आहेत आणि आम्ही आनंदात आहोत की, सातत्याने चांगले निर्णय माननीय मंत्री महोदय घेत आहेत. वेतनेतरचा न सुटणारा प्रश्न त्यांनी नुकताच सोडविला. पण आम्ही जे अभिनंदन करतो त्याचा पुनर्विचार करण्याची वेळ आमच्यावर आलेली आहे. आठवी, नववी, दहावीला शिकविण्यासाठी शिक्षक नाहीत. आता दोन वर्षे पटपडताळणीचे कारण सांगत आहेत. आताही माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की आम्हाला फेरविचार करावा लागेल. एखादी शाळा तातडीने बंद करता येत नाही. त्यांना नोटीस द्यावी लागते. शाळा बंद केली तर ते कोर्टात जाणार. ही सर्व प्रोसीजर असते आणि त्याला आणखी पाच वर्षे लागतील. तोपर्यंत आपण विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लावणार आहात का ? त्यामुळे शासनाने तातडीने याचा आढावा घेतला पाहिजे. हे शैक्षणिक वर्ष संपण्याच्या अगोदर शिक्षक भरण्यास परवानगी देणार का ? कोणतीही मागणी केली, साधी टाचणी घ्यावयाची म्हटले तरी वित्त विभाग सातत्याने सांगते की पैसे नाहीत. त्यामुळे आम्ही आता बिनपैशाची मागणी केली. जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत, ज्यांना यापूर्वी शाळासंहितेनुसार मान्यता दिलेली आहे, त्यांच्या बाबतीत संचालकांनी अहवाल दिलेला आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34903 ..... श्री. विक्रम काळे...

यासाठी पैसे लागणार नाहीत. या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुध्दा पदे भरण्यासाठी हे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या अगोदर परवानगी देणार आहात का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी या ठिकाणी दोन प्रश्न विचारले. खरे म्हणजे दुसरा जो प्रश्न आहे तो आकृतिबंधाच्या संदर्भात आहे. तो प्रश्न या ठिकाणी लागू होत नाही. सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याचा रोख वेगळा आहे. ही गोष्ट खरी आहे की, 3 ऑक्टोबर ते 5 ऑक्टोबर, 2011 या काळामध्ये जी विशेष पटपडताळणी मोहीम झाली त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनुपस्थित विद्यार्थी सापडले. त्यानंतर शासनाने एक क्वान्शस निर्णय घेतला. काही शाळांनी फसवणूक केलेली आहे आणि दुसरी गोष्ट अशी की, त्या ठिकाणी शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. खरे म्हणजे याबद्दल आम्ही कारवाई करणार होतो आणि कारवाई केल्यामुळे जे अतिरिक्त शिक्षक होते ते समायोजित झाले असते आणि आज सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो प्रश्न निर्माण झाला नसता. पण आपल्याला कल्पना आहे की, त्यानंतर औरंगाबाद खंडपीठामध्ये एक प्रकरण दाखल झाले. त्या प्रकरणाचा निकाल ऑगस्ट अखेर आलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे सांगितले आहे की, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीकोनातून कोणतीही शाळा बंद करण्यापूर्वी किंवा कोणालाही नोकरीतून काढण्याच्या अगोदर त्यांना रीतसर नोटीस दिली पाहिजे. हे सर्व काम सुरु आहे. त्यामुळे आज हे समायोजनाचे काम निश्चितपणे खोळंबलेले आहे. मी दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी सहमत आहे. विशेषत: माध्यमिक शाळांमध्ये काही ठिकाणी शिक्षक कमी पडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊ शकतो हे मला मान्य आहे. त्यामुळे एक महिन्याच्या आत जितके समायोजन करणे शक्य असेल तर ते ठीक आहे पण ज्या ठिकाणी विशेषत: माध्यमिकमध्ये जर आम्हाला वेगळे शिक्षक घ्यावे लागले तर ते त्यांना घेण्याची परवानगी आम्ही कॅबिनेटकडे जाऊन निश्चितपणे घेऊ आणि हा प्रश्न महाराष्ट्रात निश्चितपणे सुटेल एवढे आश्वासन मी सभागृहाला देऊ इच्छितो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : आपण पटपडताळणी केली हे चांगले केले असे आम्हाला वाटत होते. यामध्ये चुका केल्या भलत्यांनी आणि शिक्षा मात्र विद्यार्थ्यांना होत आहे. ज्या शाळा नियमित चाललेल्या आहेत त्यामधील शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत. आता जानेवारी महिना संपल्यानंतर शिक्षकांचे समायोजन होऊन शिक्षक मुलांना शिकविण्यासाठी जातील आणि एप्रिलमध्ये परीक्षा धेतील. मुले वर्षभर शिक्षणापासून वंचित राहिलेली आहेत. हा शिक्षण विभाग सार्वजनिक बांधकाम विभागासारखा नाही. ही गोष्ट खरी आहे की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करुन पैसे वाचविण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. परंतु हे करीत असताना लाखो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होत आहे याकडे शासनाने लक्ष दिलेले नाही. ज्या शाळांच्या बाबतीत कारवाई केली जाईल त्या कोर्टात जाऊन स्टे घेतील. अनेक शाळातून विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकच उपलब्ध नाहीत. तेव्हा शिक्षकांची भरती करण्याच्या संदर्भात शासन एक महिना न थांबता ताबडतोबीने निर्णय घेईल काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : शाळेमध्ये शिक्षक नाहीत अशी परिस्थिती नाही. कुठे 2 तर कुठे 3 या प्रमाणे शिक्षक उपलब्ध नाहीत हे मी सुरुवातीलाच मान्य केलेले आहे. त्यामुळे एक महिना न थांबता 15 दिवसाच्या आत, विशेषत: माध्यमिक शाळांच्या बाबतीत हा निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मी पुनश्च देऊ इच्छितो.

श्री. कपिल पाटील : शिक्षण विभागाने या प्रश्नाचे उत्तर देत असताना किमान व्याकरणाकडे तरी लक्ष दिले पाहिजे. छापील उत्तरामध्ये "पुनर्छाननी" ऐवजी "पुर्नछाननी" असा शब्द वापरलेला आहे.

सभापती महोदय, मुंबईतील अनेक माध्यमिक शाळांमध्ये गणित आणि विज्ञान विषय शिकविण्यासाठी शिक्षक नसल्यासंबंधीचा प्रश्न मी मागील अधिवेशनामध्ये विचारलेला होता. माननीय शिक्षण राज्यमत्री महोदयांनी या बाबतीत एक महिन्यामध्ये कार्यवाही करु असे उत्तर दिले होते. त्यानंतर एक महिना उलटून त्याबाबतीत बैठकही झाली नाही आणि कार्यवाही देखील झालेली नाही. आता दुस-या अधिवेशनामध्ये मंत्री महोदय पुन्हा एक महिन्याचा वायदा देत आहेत. गणित आणि विज्ञान विषय शिकविण्यासाठी शिक्षक नाहीत. मुलांचे संपूर्ण करिअर त्या विषयावर अवलंबून आहे. आता अर्ध्याटर्ममध्ये शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे जे नुकसान झालेले आहे त्याची भरपाई म्हणून त्या विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये 50 टक्के मार्क्स देण्यात येतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांची भावना मी समजू शकतो. 50 टक्के मार्क्स देण्याची पध्दत सध्यातरी आपल्या देशामध्ये कुठे नाही. सन्माननीय सदस्यांनी व्याकरणासंबंधीचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो प्रश्नोत्तराच्या याद्या तयार करण्याचे काम शिक्षण विभागाकडून होत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्री महोदयांनी व्याकरणाच्या मुद्याविषयी दिलेले उत्तर योग्य नाही.

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मी जरुर तपासतो. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे त्यामध्ये काही चुका असतील तर त्या मी दुरुस्त करीन.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान (आय.टी) विषयाच्या शिक्षकांच्या पदांना मान्यता व वेतनाबाबत

(६) * ३४३५० श्री.कपिल पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) शिक्षक संघटनांनी १० + २ स्तरावर सुरू असलेल्या माहिती तंत्रज्ञान (आय.टी. विषय क्र. ९७,९८, ९९) या विषयांसाठी वेतन अनुदान मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, माहिती तंत्रज्ञान या विषयावरील शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, किती प्रकरणे निकाली काढण्यात आली ?

प्रा. फोजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१) होय.

(२), (३) व (४) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, दहा अधिक दोन स्तरावर आय.टी.विषय सुरु करुन दोन वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. देशातील अनेक राज्ये आय.टी. व कॉम्प्युटर क्षेत्रात पुढे गेली आहेत. आपण या विषयांना महत्व दिले नाही म्हणून इतर राज्याच्या तुलनेत मागे पडलेलो आहोत. हे विषय अनिवार्यांच्या यादीमध्ये नाही, आपण हे विषय ऑप्शनला टाकलेले आहेत. तसेच या विषयाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे अनुदान देण्यात येत नाही. एखाद्या छोटयाशा क्लास सारखी त्या विषयांची अवस्था केलेली आहे. माजी शिक्षण मंत्री श्री.रामकृष्ण मोरे यांनी इयत्ता 1 ली पासून इंग्रजी हा विषय सक्तीचा करण्याबाबतचा ऐतिहासिक निर्णय घेतला. हा महाराष्ट्र सक्षम व्हावा म्हणून हा निर्णय घेतला. आय.टी.आणि कॉम्प्युटर क्षेत्रात महाराष्ट्र मागे पडू नये म्हणून माजी शिक्षण मंत्र्यांनी इंग्रजी विषयाच्या बाबतीत निर्णय घेतला तशाच प्रकारचा निर्णय माननीय शिक्षण मंत्री घेतील काय? हे विषय अनिवार्याच्या यादीत टाकून त्यांना अनुंदानावर आणतील काय ? हे विषय अनिवार्याच्या यादीत आल्यानंतर तो खर्च वाचतो. त्यासाठी वेगळा खर्च करावा लागणार नाही. तो खर्च वाचतो. हा महत्वाचे विषय असल्यामुळे खर्च करावा लागला तरी तो शासनाने केला पाहिजे इतका हा महत्वाचा विषय आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन 2001-2002 या शैक्षणिक वर्षापासून शासनाने इयत्ता 11 वी आणि 12 वी मध्ये आय.टी.हा विषय सुरु केलेला आहे. हा निर्णय घेतल्यानंतर प्रत्येक ज्युनियर कॉलेजला 1200 रुपये देण्याची मूभा दिली. एक गोष्ट खरी आहे की, माहिती व तंत्रज्ञान शिकविणाऱ्या शिक्षकांना 5 हजार रुपये दिले जातात. या विषयाबद्दल एका महिन्यापूर्वीच माझ्या दालनात बैठक झाली. ही गोष्ट देखील खरी आहे की, जर या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता पाहिली तर ते एम्एससी आय.टी आहेत. एमसीएम आहेत. एमएससी कॉम्प्युटर आहेत. या बाबतीत मला स्वत:ला असे वाटते की, या गोष्टीचा सकारात्मक विचार झाला पाहिजे. याचे कारण असे आहे की, कै.राजीव गांधी यांनी या देशात माहिती आणि तंत्रज्ञान आणले आहे. या राज्यात आतापर्यंत आय.टी.सी.च्या माध्यमातून 3 हजार शाळांमध्ये पूर्ण व्यवस्था केली आहे. या वर्षी आय.टी.सी.च्या माध्यमातून 5 हजार शाळांमध्ये व्यवस्था करणार आहोत. या बाबतीत आम्ही निश्चितपणे सकारात्मकच विचार करु.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34350...

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, काल झालेल्या सी.पी.ए.च्या उद्घाटन कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आपली इकॉनॉमी ही नॉलेज बेस इकॉनॉमी होणे गरजेचे आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने आपण आपल्या भावी पिढीला जास्तीत जास्त सक्षम करु शकलो तर निश्चितच पुढील काळामध्ये इकॉनॉमीच्या दृष्टीने खूप फायदा होईल. त्यामुळे मंत्री महोदय या संदर्भातील निर्णय लवकरात लवकर घेतील काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी जी भावना व्यक्त केली. त्यांच्या भावनेशी मी देखील सहमत आहे. माहिती तंत्रज्ञान विषयाच्या माध्यमातून अधिक चांगले शिक्षण कसे मिळेल या दृष्टीने आम्ही लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेणार आहोत.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्राथमिक शिक्षक सेवक भरती पूर्व परिक्षा (सीईटी) 2010 च्या पुनमरूल्यांकनामध्ये शिफारशीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत

(7) * 34302 डॉ.रणजित पाटील , श्री.नागो गाणार , श्री.विनोद तावडे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) प्राथमिक शिक्षक सेवक भरती पूर्व परिक्षा (सीईटी) 2010 च्या पुनर्मूल्यांकनामध्ये शिफारशीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी (अमरावती) मा. शालेय शिक्षण मंत्री व मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा, पुणे यांच्याकडे माहे जुलै, 2012 मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(3) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(4) अद्यापपर्यंत निर्णय घेतला नसल्यास होणऱ्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) होय.

(2), (3) व (4) केंद्रीय भरतीपूर्व परिक्षा (सी.ई.टी.) 2010 संदर्भातील तक्रारीची छाननी करण्यासाठी तक्रार निवारण समिती गठित करण्यात आली होती. तक्रार निवारण समितीचा अंतिम अहवाल शासनास नुकताच प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, प्राथमिक शिक्षक सेवक भरती पूर्व परीक्षा (सीईटी) 2010 च्या पुनर्मूल्यांकनामध्ये शिफारशीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतचा हा प्रश्न आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने सीईटी घेऊन 15 हजार शिक्षक सेवकांची शिफारस करुन त्यांना नेमणूक दिली होती. प्रश्न क्रमांक 2,3 आणि 4 च्या अनुषंगाने दिलेल्या उत्तरात विभागाने असे म्हटले आहे की, केंद्रीय भरतीपूर्व परीक्षा 2010 संदर्भातील तक्रारीची छाननी करण्यासाठी तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली होती. सदर बाबीच्या संदर्भात तक्रारकर्त्यांना न्याय मिळाला नाही म्हणून ते मार्चमध्ये न्यायालयात गेले. या संदर्भात न्यायालयाने पुनर्मूल्यांकनाचा आदेश दिला. पुनर्मूल्यांकनामध्ये 10 प्रश्ने अशी सापडली की, त्या प्रश्नांची चुकीची उत्तरे ग्राहय धरली गेली. सदरच्या 10 प्रश्नांची ज्यांनी बरोबर उत्तरे दिली होती, त्यांना गुण मिळाले नाहीत. 2 हजार उमेदवारांना अशा प्रकारचे गुण मिळाले नाहीत, त्यामुळे त्यांना नेमणुका दिल्या गेल्या नाहीत. त्यांची गुणपत्रिका मार्च महिन्यातच देण्यात आली. आपण 15 हजार

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34302...

डॉ.रणजित पाटील...

शिक्षकांची भरती केलेली आहे. या ठिकाणी फक्त 2 हजार शिक्षण सेवकांचा प्रश्न आहे. काही काही शिक्षण सेवकांच्या नेमणुका दीड ते दोन वर्षे लांबविल्या. काही जिल्हयांची शिक्षण सेवकांची अतिरिक्त मागणी केली होती. या 2 हजार शिक्षण सेवकांचे समायोजन करण्याबाबत शासनाने धोरण काय आहे ?

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34302.....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हे खरे आहे की, 15012 शिक्षण सेवकांची ज्यावेळी भरती करण्यात आली त्यावेळच्या परीक्षा पेपरमध्ये चुका आहेत अशी तक्रार करण्यात आली. माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार छाननी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. छाननीनंतर काही विद्यार्थ्यांचे गुण वाढले. त्याप्रमाणे संचालकांकडून 6 डिसेंबर रोजी शासनाला अहवाल सादर झालेला आहे. या अहवालाची छाननी सुरु आहे. माननीय उच्च न्यायालयाने ज्याप्रमाणे आदेश दिलेले होते त्यानुसार पुनर्मूल्यांकन केल्यामुळे जो बदल आलेला आहे, त्या बदलानुसार शिक्षकांना सामावून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : प्रत्येक अधिवेशनात शासनाकडून हेच उत्तर दिले जाते. एका महिन्याच्या काळात ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल काय?

प्रा.फौजिया खान : याची छाननी सुरु आहे. शासनाचा अहवाल आल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : स्पेसिफिक प्रश्न विचारण्यात आला आहे. छाननी सुरु आहे हे किती वेळा सांगण्यात येणार आहे?

सभापती : या संदर्भातील सविस्तर अहवाल संचालकांकडून शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. त्या अहवालावर निर्णय घेण्यामध्ये विलंब लागण्याचे काही कारण नाही, असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

प्रा.फौजिया खान : प्राप्त अहवालाची शासन स्तरावर छाननी सुरु आहे. ती छाननी पूर्ण झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, अडीच वर्षापूर्वीचा हा प्रश्न आहे. तक्रार निवारणाच्या माध्यमातून जे उमेदवार परीक्षेमध्ये उत्तीर्ण होतात किंवा मेरिटमध्ये येतात त्यांना केव्हापर्यंत सेवेत सामावून घेणार या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. दुसरा एक मुद्दा आहे. शासन स्तरावर अहवालाची छाननी करीत असताना विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक झाले आहे. याचे कारण असे की, 15012 पदांसाठी शिक्षण विभागाने मान्यता घेतलेली आहे. ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पदे भरुन झालेली आहेत. यापेक्षा अधिक पदे भरावयाची असतील तर नियमांचा भंग होणार नाही हेही पाहणे आवश्यक आहे. त्यासाठी निश्चितपणे विधी व न्याय विभागाबरोबर आवश्यक चर्चा करुन या विषयाला न्याय कसा देता येईल या दृष्टीकोनातून प्रयत्न केला जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईंट ऑफ प्रोसीजरसंबंधी</u>

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. आजच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये चार प्रश्नांवरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर मी मुद्दा मांडण्यासाठी आपली परवानगी मागितली होती. उत्तरित झालेल्या चारही प्रश्नांबाबत आपण मंत्री महोदयांना संबंधित माननीय सदस्यांसमवेत दालनामध्ये बैठक बोलावून मार्ग काढण्याचे सूचित केले आहे. जर दालनामध्ये बैठक घेऊन मार्ग काढावयाचा असेल तर हे सभागृह कशासाठी आहे? हा आपल्या मनाचा मोठेपणा आहे. परंतु आपण मंत्री महोदयांना किती काळ संरक्षण देणार आहात? मंत्री महोदयांना अभ्यास करुनच सभागृहात यायला सांगावे.

सभापती : प्रश्नोत्तरासाठी एक तासाची वेळ निश्चित ठरलेली आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आपण फक्त 7 प्रश्नांवरील चर्चा पूर्ण केलेली आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

प्रत्येक प्रश्न कर्त्याला असे वाटत असते की, काहीही झाले तरी आपला प्रश्न चर्चेला आलाच पाहिजे. प्रश्नोत्तराच्या तासात किमान 12 प्रश्न झाले पाहिजे असे मी नेहमी सांगत असतो. 12 प्रश्नापेक्षा अधिक प्रश्न चर्चेला आले तर ते चांगलेच. परंतु एखादा प्रश्न असा काही अडवतो की, त्या प्रश्नावर 14 मिनिटे चर्चा झाली तरी तो संपतच नाही. अशावेळी मी दालनात चर्चा करण्याची सूचना करीत असतो.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील आठवा प्रश्न गंभीर विषयाच्या संदर्भात होता. हा प्रश्न वेळेअभावी घेता आला नाही. त्यामुळे हा प्रश्न वेगळया आयुधाच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित करण्याची संधी आपण मला द्यावी अशी विनंती आहे.

सभापती : या विषयाच्या संदर्भात जरुर प्रयत्न करण्यात येईल.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी एका गोष्टीसाठी आपले आभार मानू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे म्हणाले की,"सगळयाच गोष्टी आपल्या दालनात होतील का ? काही तरी या सभागृहात होतील की नाही ?" याप्रश्नाच्या संदर्भात मी संपूर्ण उत्तर दिल्यानंतर आपण सांगितले होते की, "अरे प्रश्नाचे उत्तर तर तुम्हाला येथेच मिळाले आहे, त्यामुळे दालनात जाण्याची गरज नाही." सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना आपण न्याय मिळवून दिल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी व बारावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी व बारावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी व बारावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव
मु.शी.: भारतरत्न, प्रख्यात सतारवादक पंडित रविशंकर यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, भारतरत्न, प्रख्यात सतारवादक पंडित रविशंकर यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"भारतरत्न, प्रख्यात सतारवादक पंडित रविशंकर यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

भारतरत्न, प्रख्यात सतारवादक पंडित रविशंकर तथा रविंद्र शंकर चौधरी, यांचा जन्म दिनांक 7 एप्रिल 1920 रोजी वाराणसी येथे झाला.

कै. पंडित रविशंकर यांनी लहानपणीच सुप्रसिध्द संगीतकार अल्लाउद्दिन खाँ यांच्याकडे सतार वादनाचे शिक्षण घेतले. त्यांनी अल्पावधीतच सतार वादनात प्रावीण्य मिळविले. नंतरच्या काळात शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात आपले अढळ स्थान निर्माण करतानाच त्यांनी सतार वादनाच्या माध्यमातून भारतीय संगीताला आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली.

कै. पंडित रविशंकर यांनी इंडियन पिपल्स थिएटर असोसिएशन या संस्थेतून नृत्य नाटिकांसाठी संगीत रचना तयार केल्या. दिल्लीच्या अखिल भारतीय आकाशवाणी वाद्यवृंदाचे संचालक, मुंबईतील "किन्नर" संगीत संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले होते.

कै. रविशंकर यांनी संगीत रचनाकार म्हणून केलेली कामगिरी भरीव आहे. त्यांनी मोहम्मद इक्बाल यांच्या "सारे जहाँसे अच्छा" या देशभक्तीवरील गाण्याला एक वेगळे संगीत देखील दिले होते. त्यात रविशंकरांच्या खास शैलीचा ठसा सहजपणे जाणवतो. त्यांनी भारताच्या सांस्कृतिक चळवळीची मनोभावे सेवा करुन सतार वादनाला जगभर प्रतिष्ठा मिळवून दिली. जार्ज हॅरिसन यांनी रविशंकर यांच्या "शंकर फॅमिली अँड फ्रेंडस" आणि "फेस्टिव्हल ऑफ इंडिया" या दोन अल्बमची निर्मिती केली होती. पंडित रविशंकर यांनी संगीतबध्द केलेले हे दोन्ही अल्बम जगभरात प्रचंड गाजले होते.

ज्येष्ठ सतारवादक पंडित रविशंकर यांच्या निधनाने जागतीक कीर्तीचे महान कलावंत, ऋषी तुल्य व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. पंडितजी म्हणजे भारतीय संगीतामधील तेजोमय सूर्य होते. त्यांच्या सतार वादनाने भारतीय संगीताचे सूर खऱ्या अर्थाने जगभरात निनादले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

भारतीय संगीताची जादू विदेशात विशेषत: पाश्चात देशामध्ये पोहचविण्यात तसेच लोकप्रिय करण्यामध्ये पंडितजींचे फार मोठे योगदान आहे. त्यांनी भारतीय संगीताला मान, सन्मान आणि जागतीक कीर्ती मिळवून दिली. 50 वर्षापूर्वी म्हणजे 1958 मध्ये युनिस्कोच्या दहाव्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात त्यांच्या सतार वादनाचा कार्यक्रम झाला होता. त्या कार्यक्रमाला उपस्थित असलेले विविध देशाचे रसिक, श्रोते हे पंडितजीच्या सतारवादनाने अक्षरश: मंत्रमुग्ध झाले होते.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

त्यांच्या सतार वादनात अनोखी जादू होती. त्यांच्या सतारवादनाने मनाला शांती आणि कमालीचा आनंद मिळायचा. लोकांची चिंता, थकवा दूर करण्याची ताकद पंडितजींच्या सतारीच्या सुरात होती. त्यांच्या निधनाने भारतीय संगीत विश्वाचेच नव्हे तर जागतिक संगीत क्षेत्राचे फार मोठे नुकसान झाले आहे. पंडित रविशंकर यांच्या शास्त्रीय संगीतातील अतुलनीय योगदानाची जगभराने नोंद घेतली. त्यामुळेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले होते. त्यात रॅमन मॅगेसेस पुस्कार, ग्रामी पुरस्कार, तसेच संगीत कला अकादमी पुरस्कार, कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट ऑफ फाईन आर्टस् पदवीने गौरविण्यात आले होते. भारत सरकारने 1967 मध्ये पद्मभूषण, 1981 मध्ये पद्मविभूषण तर 1999 मध्ये देशातील सर्वोच्च असणारा भारतरत्न किताब देऊन त्यांना सन्मानित केले होते. पं.रविशंकर हे 1986 मध्ये राज्य सभेवर नामनियुक्त देखील झाले होते. गेल्या सात दशकाहून अधिक काळ आपल्या सुमधूर स्वरांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या या महान कलावंताचे बुधवार दिनांक 12 डिसेंबर 2012 रोजी दु:खद निधन झाले. त्यांना सभागृहाच्यावतीने मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.अजित पवार यांनी प्रख्यात सतारवादक पंडित रविशंकर यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला त्यास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

पंडित रविशंकर हे उत्तर प्रदेशमधील काशी-वाराणसी येथे जन्मले होते. त्यांचे शालेय शिक्षण पॅरिस येथे झाले होते. सारे जहाँसे अच्छा या गाण्याचे कंपोझिंग कोणी केले याची माहिती घेतली तेव्हा ते कंपोझिंग पंडितजींचे होते हे समजले. ते चित्रपटांना संगीत देत होते काय, याची देखील माहिती घेतली तेव्हा श्री.सत्यजित रे यांच्या "पाथेर पंचोली", रिचर्ड ॲटनबरो यांच्या "गांधी" या चित्रपटांना देखील पंडितजींनी संगीत दिले होते. त्यामुळे त्यांचा परिचय हा शास्त्रीय संगीतापुरता न राहता चांगल्या व्यावसायिक चित्रपटांपुरता देखील होता. पंडितजींचे संगीत असल्यामुळे त्या चित्रपटांची उंची देखील वाढली होती.

पंडितजींमुळे आपल्या संगीताचा विदेशामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. त्यांच्या माध्यमातूनच भारतीय चित्रपटाला खऱ्या अर्थाने परिचय मिळाला आहे. 1971 मध्ये बांगला देश मुक्ती संग्रमाच्या पाठिंब्यासाठी न्युयॉर्कमधील मेडिसीन स्वेअरमध्ये कॉन्सर्ट आयोजित करण्यात आली होती. ही कॉन्सर्ट तेथील प्रख्यात संगीत दिग्दर्शक जॉर्ज हॅरिसन यांनी आयोजित केली होती. त्यामध्ये त्यांनी पंडितजींना आमंत्रित केले होते. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली भूमिका त्यांच्या माध्यमातून जात होती. प्रसिद्ध व्हायोलियन वादक युहुदी मेनुईन यांच्या समवेत पंडितजींनी सतार वादनाचे कंपोझिंग केले होते. यहुदी मेनुईन हे नाव फार मोठे आहे. त्यांच्या समवेत पंडितजींनी कंपोझिंग करणे हे फार महत्त्वाचे होते. पंडितजींच्या सतार वादनामुळे आपल्या देशाची मान परदेशात ताठ होती. त्याद्वारे आपल्या देशाचे नाव देखील होत होते.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

पंडितजींना अनेक पुरस्कार मिळाले. नंतर नंतर तर पंडितजींना पुरस्कार दिला तर त्या पुरस्काराचे महत्व वाढेल असे वाटू लागले. त्या दृष्टीनेच काही विश्वविद्यालये त्यांना डी.लिट.सारखे पुरस्कार देण्याचा विचार करीत होते. क्वीन एलिझाबेथ दुसऱ्या यांनी नाईट कमांडर, ऑर्डर ऑफ ब्रिटीश एम्पायर या पुरस्काराने पंडितजींना गौरविले होते. तो इंग्लंडमधील सर्वात मोठा बहुमान मानला जातो. हा पुरस्कार भारतीयाला मिळणे या देखील एक वेगळे महत्व आहे. अशा प्रकारचा मान पंडितजींना मिळत होता. अमेरिकेतील जॅझ सेक्सोफोनिस्ट जॉन पोल्ट्रेनने आपल्या मुलाचे नाव रवी ठेवले. हे नाव पंडितजींच्या नावावरूनच ठेवले होते. एवढे त्यांच्या मनात, हृदयात पंडितजींचे नाव होते. अशा पंडितजींचे निधन 12 डिसेंबर 2012 रोजी झाले. त्यांना सभागृहाच्या वतीने मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

.....

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाचे नेते, राज्याचे उप मुख्यमंत्री, माननीय श्री.अजित पवार यांनी भारतरत्न, प्रख्यात सतारवादक पंडित रविशंकर तथा रवींद्र शंकर चौधरी यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे. त्यावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री विनोद तावडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

भारतरत्न, प्रख्यात सतारवादक पंडित रविशंकर तथा रवींद्र शंकर चौधरी यांचा जन्म दिनांक 7 एप्रिल. 1920 रोजी वाराणसी येथे झाला.

पंडित रविशंकर यांनी लहानपणी सुप्रसिध्द संगीतकार अल्लाउद्दिन खाँ यांच्याकडे सतार वादनाचे शिक्षण घेतले. त्यांनी अल्पावधीतच सतार वादनात प्रावीण्य मिळविले. नंतरच्या काळात शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात आपले अढळ स्थान निर्माण करतानाच त्यांनी सतार वादनाच्या माध्यमातून भारतीय संगीताला आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली.

पंडित रविशंकर यांनी "इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन" या संस्थेतून नृत्य नाटिकांसाठी संगीत रचना तयार केल्या. दिल्लीच्या अखिल भारतीय आकाशवाणी वाद्यवृंदाचे संचालक, मुंबईतील "किन्नर" संगीत संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले होते.

पंडित रविशंकर यांनी बंगाली आणि हिंदी चित्रपटात संगीतकार, पार्श्वसंगीतकार तसेच रचनाकार म्हणून केलेली कामगिरी अतुलनीय आहे. सत्यजित रे यांचा "पाथेर पांचाली" हा त्यांच्या संगीताचा सुवर्णस्पर्श लाभलेला पहिला चित्रपट होता. तर रिचर्ड ॲटनबरो यांचा "गांधी" हा संगीतकार म्हणून पंडित रविशंकर यांचा अखेरचा चित्रपट होता. त्यांनी मोहम्मद इक्बाल यांच्या "सारे जहाँसे अच्छा" या देशभक्तीवरील गाण्याला एक वेगळे संगीत देखील दिले होते. त्यात रविशंकरांच्या खास शैलीचा ठसा सहजपणे जाणवतो. त्यांनी भारताच्या सांस्कृतिक चळवळीची मनोभावे सेवा करुन सतार वादनाला जगभर प्रतिष्ठा मिळवून दिली. जॉर्ज हॅरिसन यांनी रविशंकर यांच्या "शंकर फॅमिली ॲण्ड फ्रेंडस" आणि "फेस्टीव्हल ऑफ इंडिया" या दोन अल्बमची निर्मिती केली होती. पंडित रविशंकर यांनी संगीतबध्द केलेले हे दोन्ही अल्बम जगभरात प्रचंड गाजले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

रविशंकर यांच्या शास्त्रीय संगीतातील अतुलनीय योगदानाची जगभराने दखल घेतली त्यामुळेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानीत केले होते. त्यात "रॅमन मॅगसेसे" पुरस्कार, "ग्रॅमी" पुरस्कार, तसेच "संगीत कला अकादमी" पुरस्कार तसेच कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून "डॉक्टरेट ऑफ फाईन आर्टस्" पदवीने गौरविण्यात आले होते. भारत सरकारने 1967 मध्ये "पद्मभूषण" 1981 मध्ये "पद्मविभूषण" तर 1999 मध्ये देशातील सर्वोच्च असणारा "भारतरत्न" किताब देऊन त्यांना सन्मानित केले होते. पंडित रविशंकर हे 1986 मध्ये राज्यसभेवरही नामनियुक्त झाले होते.

सात दशकाहून अधिक काळ आपल्या सुमधूर स्वरांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या या महान कलावंताचे बुधवार, दिनांक 12 डिसेंबर, 2012 रोजी दुःखद निधन झाले.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

ज्येष्ठ सतारवादक पंडित रविशंकर यांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो व भावपूर्ण आदरांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाचे कामकाज 30 मिनिटांकरिता तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.20 ते 1.50 वाजेपर्यंत स्थगित झाली)

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)

पृ.शी:/मु.शी : औचित्याचा मुद्दा

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे.

उप सभापती : ठीक आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. इयत्ता 9 वी च्या वाहतूक पुस्तकात संबंधात अनेक अक्षम्य चुका असल्याची धक्कादायक बाब नुकतीच निदर्शनास आली आहे. राज्यामध्ये एकीकडे रस्ते अपघातामध्ये लाखो लोक मृत्युमुखी पडतात आणि कायमचे जायबंदी होतात आणि असे प्रकार वाढत असताना राज्यामध्ये वाहनांची संख्या देखील वाढत आहे.अशा अपघातांमध्ये मृत्यू पावणाऱ्या लोकांची वाढती संख्या पाहता यामुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनलेला असणे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुलांमध्ये वाहतुकीविषयी जागरुकता निर्माण करण्याकरता नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा यासंबंधातील अभ्यासक्रम 2011 पासून विद्यार्थ्यांना शिकवण्यात येणे. मात्र या अभ्यासक्रमामध्ये गंभीर चुका असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही शासनाकडून याबाबत काहीही कार्यवाही केली जात नाही. यासाठी शासनाने ताबडतोब सदरहू पुस्तकामध्ये सुधारणा कराव्यात अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

---

2 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही एसआयटीच्या संदर्भात मागणी करीत आहोत.

उप सभापती : एसआयटी म्हणजे सीट. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपल्याला सहकार्य करीत आहेत. त्यांना खाली बसण्यास सांगितल्यावर ते शांतपणे बसले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण एसआयटी म्हणजे सीट असे म्हटले. आपण एसआयटी मान्य केल्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो.

उप सभापती : एसआयटी म्हणजे सीट म्हणजेच खाली बसा असे मी म्हणालो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण एसआयटी मान्य केल्याबद्दल धन्यवाद देतो. सभापती महोदय, आज विरोधी पक्षातर्फे नियम 289 अन्वये पुन्हा प्रस्तावाची सूचना देण्यात आली आहे. 289 च्या माध्यमातून ....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटेसाहेब यांनाही नंतर बोलण्यासाठी संधी देतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला संरक्षण द्यावे. आम्हाला बोलू द्यावे. विरोधी पक्षाने नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या बोलण्यावर माझी हरकत आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला या विषयावर बोलण्यासाठी संमती द्यावी.

(सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला दोन मिनिटे बोलू द्यावे. आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. एका बाजूला शासन एसआयटी मान्य करीत नाही. त्यांनी सिंचनाच्या बाबतीत काही तरी माहिती काढली पण त्यांनी ती प्रकाशित करण्याच्या आधी विरोधी पक्षाने त्यांच्याही आधी पत्रिका काढली. त्यांना त्यांची पुस्तिका सुध्दा प्रकाशित करता आलेली नाही. तुमच्या आधी ती आमच्याकडे आली आणि त्यामुळे हे सर्व बाहेर पडत आहे. सत्यावर घाव....

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

उप सभापती : मला या परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी दहा मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.01 ते 2.10 पर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपणास अशी विनंती करु इच्छितो की, ...

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून मोठ्याने बोलतात.)

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा ऐकून घेतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसना जवळील वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा घ्यावी असे अनेक वेळा लिहून दिलेले आहे. मी आपणास नियम वाचून दाखवितो. नियम 289 मध्ये असे नमूद केलेले आहे की, "कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करताना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल."

सभापती महोदय, आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावा संबंधी निर्णय दिलेला असताना त्या निर्णयाचे उलंघन विरोधी पक्षाकडून केले जात आहे. म्हणून हे अधिवेशन संपेपर्यंत विरोधी पक्षातील संबंधित सन्माननीय सदस्यांना निलंबित करावे अशी माझी मागणी आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागी जाऊन बसावे मी पुढील कामकाज घेत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 2012च्या द्वितीय अधिवेशनात सभागृहात दिनांक 9 जुलै ते 25 जुलै, 2012 या कालावधीत माननीय मंत्री, माननीय राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या एकूण 507 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस :कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 1988च्या तिस-या अधिवेशनापासून ते सन 2012च्या द्वितीय अधिवेशनापर्यंत विधानपरिषद सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी एकूण 829 आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या विवरणपत्राची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : विवरणपत्राची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या विवरणाची यादी छापावी.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सचिन अहिर (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचा सन 2009-2010 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. मोहन जोशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 14 डिसेंबर 2012 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 13 डिसेंबर 2012 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार खालील अशासकीय ठरावांना वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

बॅलटद्वारे ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव

डॉ.दीपक सांवत, वि.प.स.यांच्या ठराव क्रमांक 36 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही

श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 31 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही

श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 16 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

उप सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत</u>

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

उप सभापती : आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविलेल्या सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत.

(गोंधळ)

आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आलेला म.वि.प.नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव देखील पुढे ढकलण्यात येत आहे.

(गोंधळ)

त्याचप्रमाणे आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या सर्व अर्धा तास चर्चेच्या सूचना देखील पुढे ढकलण्यात येत आहेत.

(गोंधळ)

सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्था□□त होऊ□ उद्या शुक्रवार, दि□□ 14 डिसेंबर, 2012 रोजी स□ळी 10.30 भरेल. सकाळी 10.30 ते 11.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक पु□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ दुपारी 2. 17 वाजता, शुक्रवार , दि□□
14 डिसेंबर, 2012 रोजीच्या स□ळी 10.30 वाजेपर्य□त स्था□□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही